म.ग्रं.सं. वाचनालय, शाखा ठाणे
विषय : ~~...~~ नाटक....
दा.क्र. : १८३२४

१८३२४

IRBK-0118324
IRBK-0118324

१८३२
३०१५
वाचनाल

# मंतरलेली चैत्रवेल

सुरेश खरे

IRBK-0118324

IRBK-0118324

रुपये आठ फक्त

जोशी ब्रदर्स बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स
अप्पा बळवंत चौक, पुणे २

वि. ... क्र. ...

श्री. वसंतराव जोगळेकर

व

सौ. सुमती जोगळेकर

यांस—

'मंतरलेली चैत्रवेल' या नाटकाचा प्रथम प्रयोग शनिवार दिनांक २२ डिसेंबर १९७९ रोजी रात्रौ ८–३० वाजता दीनानाथ नाट्यगृह, विलेपार्ले, मुंबई, येथे 'दि गोवा हिंदु असोसिएशन' (कला विभाग) या संस्थेतर्फे सादर करण्यात आला. त्यात भाग घेणारे कलावंत—

लोखंडे – शशिकांत शिर्सेकर
लीलाबाई – शांता जोग
कर्नल – दत्ता भट
प्रदीप – जयराम हर्डीकर
चारू – मीनल जोशी
सुमित्रा – दया डोंगरे
दिग्दर्शक, प्रकाशयोजना – अशोक साठे

नेपथ्य – द. ग. गोडसे
पार्श्वसंगीत – प्रभाकर साठे
रंगभूषा – अशोक पांगम
वेषभूषा – पंढरीनाथ खटावकर
छाया – राजदत्त

निर्मिती – दि गोवा हिंदु असोसिएशन (कला विभाग)

ध्वनिसंकेत – राजा देसाई

★

पूर्वपरीक्षण प्रमाणपत्र क्रमांक – डी आर एम् / ८९१ / ७९
दिनांक २४–१०–७९

# अंक पहिला

## दृश्य पहिले

[ पडदा उघडतो तेव्हा दृष्टीस पडतो एक फ्लॅटचा दिवाणखाना. सजावटीत नीटनेटकेपणा, शिस्त पण सौंदर्यदृष्टीचा अभाव. दारावरची बेल वाजते. आतून लीलाबाई उग्र व्यक्तिमत्त्वाची प्रौढा, या घरातील नोकर न वाटणारी पण नोकर, आतून बाहेर येते. दार उघडते. दारात उसना रुबाब धारण केलेला वावळट तरुण लोखंडे. ]

**लोखंडे** : कर्नल राजे...

**लीला** : ( त्याला तोडत ) बसा तिथं. येतील ते.

[ आत जाते. लोखंडे बसतो. क्षणार्धात रिटायर्ड कर्नल राजे, भारदस्त व्यक्तिमत्त्व. बाहेर येतात. ]

**कर्नल** : एक्सक्यूज मी. आय ॲम अ बिट लेट.

**लोखंडे** : सो व्हॉट ? इट डझ नॉट मॅटर.

**कर्नल** : तुम्हाला फार वेळ वाट पहावी लागली नाही ना ?

**लोखंडे** : नो, नो... आताच आलो.

**कर्नल** : मी...कर्नल राजे...

**लोखंडे** : आय ॲम वासुदेव वामन लोखंडे.

**कर्नल** : वा ऽ ...

**लोखंडे** : वा नाही...वा. वा....

**कर्नल** : अच्छा अच्छा... ! तुमचं बी. ए. ला मराठी होतं का ?

**लोखंडे** : अगदी बरोबर !

**कर्नल** : मग बरोबर. पण ॲप्लिकेशनमध्ये तुम्ही तसं लिहिलं नव्हतं.

**लोखंडे** : मुद्दामच लिहिलं नव्हतं. बी. ए. विथ मराठी असं अर्जातच लिहिलं, की तुम्हाला माहीत नाही, अर्जं सरळ केराच्या टोपलीत फेकून देतात. मग पोस्ट कुठचीही असो.

कर्नल : ते फारसं चुकीचं आहे असं नाही वाटत...

लोखंडे : असं कसं... वी कॅनॉट शो अवर मेटल.

कर्नल : ओ गॉड...

लोखंडे : आता पहा. तुम्ही पण मला इंटरव्हयूला बोलावलं नसतं. प्रायव्हेट सेक्रेटरीची पोस्ट असूनसुद्धा...

कर्नल : सध्या काय काम करता तुम्ही ?

लोखंडे : फक्त अर्ज...

कर्नल : बी. ए. केव्हा झालात तुम्ही ?

लोखंडे : मागच्या वर्षी. तेव्हापासून अर्ज करतोय. मी अर्ज सायक्लोस्टाइल करून घेतले होते. पण हल्ली हातानं लिहून पाठवतो.

कर्नल : का ?

लोखंडे : कारण एका मित्रानं सांगितलं की, सायक्लोस्टाइल अर्ज आणि सायक्लोस्टाइल कुंडल्या...मुलींच्या...पाठवल्या की वाईट इंप्रेशन होतं... समोरच्याला समजतं... कुठंच जमत नाहीय्. असलं तरी समजायला कशाला हवं बाकीच्यांना ? काय ? मला फार गरज आहे. वर्षभर बेकार आहे मी. वडील रिटायर्ड झाले आहेत. दोन बहिणींची लग्नं व्हायची आहेत...

कर्नल : कामाचं स्वरूप माहीत आहे तुम्हाला ?

लोखंडे : कोणतंही काम करायची तयार आहे माझी.

कर्नल : आणि पगाराची अपेक्षा ?

लोखंडे : तुम्ही द्याल तो.

कर्नल : (क्षणभर विचार करून) माफ करा, स्पष्ट बोलतो, पण माझ्या अपेक्षेमध्ये तुम्ही बसत नाही.

लोखंडे : (नर्व्हस) बरोबर आहे. जाहिरातीत म्हटल्याप्रमाणं तुम्हाला उमदा तरुण हवाय. पण उमदा हे विशेषण माणसाकरता नाही. उमदी असतात ती जनावरं. माणसं कुठं उमदी असतात ?

कर्नल : तेवढचं कारण नाहीये. एकूणच तुम्ही माझं काम करू शकणार नाही. ते तुम्हाला जमणार नाही. आय ॲम सॉरी.

लोखंडे : आय् ॲम ऑलसो सॉरी. पण हॅपीसुद्धा. तुम्ही तोंडावर सांगितलं नंतर कळवतो म्हणून आशेचं बोट नाही लावून ठेवलंत. मी एक संग्रह केलाय

रिग्रेट लेटर्स किती प्रकारची असू शकतात त्यांचा. शेकडो लेटर्स आहेत माझ्याकडे. उद्धट, उर्मट, तुटक, सौजन्यपूर्ण, मीठ चोळणारी, नाही न म्हणता म्हणणारी, मधासारखी गोड, एका ओळीची, एका पानाची. शेकडो... (हसतो. हसता हसता गंभीर होतो.) तुम्ही म्हणाल हा माणूस लाचार आहे. गरजवंत आहे. म्हणून लाचार आहे. कुत्र्यासारखा. हो, कुत्र्यासारखा. साहेबांच्या भाषेत एक छान म्हण आहे. एव्हरी डॉग हॅज हिज डे. प्रत्येक कुत्र्याचाही दिवस येतो. मला वाटतं, कुत्र्याचेच दिवस येतात. निदान हल्लीच्या जगात तुम्हाला काय वाटतं?...माफ करा, तुमचा फार वेळ घेतला. सौजन्यानं ऐकून घेतलंत म्हणून इतकं बोललो.)

कर्नल : मलाही आश्चर्य वाटतंय् मी इतक्या सौजन्यानं सारं ऐकून कसं घेतलं.

लोखंडे : म्हणजे...

कर्नल : मला इतकं ऐकून घ्यायची सवय नाही.

लोखंडे : का?

कर्नल : इतकं माझ्याशी कुणी बोलत नाही.

लोखंडे : मीसुद्धा तुमच्याशी इतकं बोललो नसतो. पण एकदा नोकरी मिळत नाही हे समजल्यावर म्हटलं बोलून टाकू या काय वाटतंय ते.

कर्नल : मग आता हलकं वाटतंय?

लोखंडे : खूपच! साहेब, जगातला एकच भार असा आहे जो नुसता बोलल्यानं कमी होतो. पण दुसऱ्यावर पडत नाही— मनाचा भार.

कर्नल : दॅट्स इंटरेस्टिंग.

लोखंडे : बेकारीत एक गंमत असते. रिकामा वेळ भरपूर असतो. छान छान कल्पना सुचतात. कधी लक्षात न आलेल्या गोष्टी लक्षात येतात. उदा. तुम्हाला माझी कल्पना इंटरेस्टिंग वाटली पण मी इंटरेस्टिंग नाही वाटलो.

कर्नल : नो, नो, यू आर ऑल्सो इंटरेस्टिंग. मला शक्य असतं, किंवा तुम्ही मला योग्य वाटला असता तर मी तुम्हाला नक्की नोकरी दिली असती. पण खरंच माझा नाइलाज आहे. आय एम् रिअली सॉरी.

लोखंडे : तुम्ही कशाला वाईट वाटून घेताय्. आपल्याला सवय आहे नकाराची.

**कर्नल :** पण तुमच्यायोग्य नोकरी आढळली तर जरूर कळवीन तुम्हाला. तुम्ही असं करा— तुमचा पत्ता देऊन ठेवा. आय बुईल ट्राय फॉर यू.

**लोखंडे :** ( पत्ता देतो ) थँक यू व्हेरी मच. बघा कुठं जमलं तर, उपकार होतील. [ जातो ]

**कर्नल :** ( स्वतःशीच ) पुअर थिंग !

**कर्नल :** चारू... चारू... [ लीलाबाई येतात ] चारू कुठंय ?

**लीला :** बाहेर गेलीय.

**कर्नल :** एकटीच ? तुम्ही जाऊ कशी दिलीत...?

**लीला :** गाडीतून गेल्या आहेत. पंधरा मिनिटांत येतील. ड्रॉयव्हरला सांगितलंय् मी तसं.

**कर्नल :** पण तरीही तुम्ही तिला अशी एकटी पाठवत जाऊ नका.

**लीला :** तुम्हांला माहीत आहे त्यांना मी कधीच एकटं बाहेर पाठवीत नाही. गेली वीस वर्षं नोकरी करतेय तुमच्याकडे, पण कर्तव्यात कसूर नाही केली कधी.

**कर्नल :** हे आज मुद्दाम का ऐकवताय मला ?

**लीला :** कारण चारुताईंना माझं वागणं आवडत नाही.

**कर्नल :** तुमचं वागणं म्हणजे ?

**लीला :** म्हणजे माझं त्यांच्यावरचं नियंत्रण ! त्यांना जरा समज द्या !

**कर्नल :** वेळ आली आणि गरज पडली तर जरूर देईन.

**लीला :** माझ्यासारख्या नोकरमाणसावर त्यांनी प्रेम करावं अशी माझी मुळीच इच्छा नाही. पण निदान...

**कर्नल :** त्याला कारण तुमचा कडवटपणा......

**लीला :** पण तो कडवटपणा का आलाय त्याचा विचार केलाय् तुम्ही ?

**कर्नल :** इनफ ऑफ इट... ( बाहेरची बेल वाजते ) बघा कोण आलंय ते. ( लीलाबाई दार उघडतात. एक उमदा तरुण प्रवेश करतो. ) कम इन्. प्लीज कम इन्...यू आर मिस्टर...

**प्रदीप :** प्रदीप देशपांडे.

**कर्नल :** कर्नल राजे.

**प्रदीप :** हाऊ डू यू डू ?

**कर्नल :** बसा. लीलाबाई, तुम्ही बाहेरच थांबा जरा. [ लीलाबाई जातात. ]

**प्रदीप :** प्रायव्हेट सेक्रेटरीच्या जागेकरता...

**कर्नल :** आय नो. मीच तुम्हाला बोलावलंय्. सध्या काय करता तुम्ही ?

**प्रदीप :** एम. ए. झालोय्. थिसीस लिहितोय पीएच्. डी. साठी.

**कर्नल :** मग तुम्हाला कशी जमणार ही नोकरी ?

**प्रदीप :** फुल टाइम असेल तर निश्चित जमणार नाही. माझी पीएच. डी. मला जास्त महत्त्वाची आहे.

**कर्नल :** सब्जेक्ट ?

**प्रदीप :** सायकॉलॉजी.

**कर्नल :** ओह ! आय सी ! तुमची पगाराची काय अपेक्षा आहे ?

**प्रदीप :** माफ करा. पण कामाचं स्वरूप समजल्याशिवाय पगाराचं सोडा, पण मी स्वीकृतीसुद्धा सांगू शकणार नाही.

**कर्नल :** मी महिन्याला पाचशे रुपये पगार देईन.

**प्रदीप :** तरीही नाही. कामाचं स्वरूप समजायला नको ?

**कर्नल :** प्रायव्हेट सेक्रेटरीज जॉब, इज अ प्रायव्हेट सेक्रेटरीज जॉब. दॅटस् ऑल.

**प्रदीप :** आर यू शुअर ?

**कर्नल :** का– ?

**प्रदीप :** मग हा पगार फार आहे. माफ करा, मला नोकरी स्वीकारता यायची नाही. त्याचं काय आहे, एखादी गोष्ट अतिशय स्वस्त मिळाली किंवा एखाद्या गोष्टीला तिच्या लायकीच्या मानानं जास्त किंमत मिळाली की, मला नेहमीच त्यात संशयास्पद वाटतं. तुम्हाला अडीचशे रुपयांत सहज चांगला सेक्रेटरी मिळू शकेल. अच्छा !

**कर्नल :** निघालात कुठं ? बसा, यू आर रिअली स्मार्ट.

**प्रदीप :** थँक्स.

**कर्नल :** कामाचं स्वरूप तुम्हाला आधीच समजायला पाहिजे !

**प्रदीप :** ऑफ कोर्स. त्यावर माझा निर्णय अवलंबून राहील.

**कर्नल :** यू आर डिक्टेटिंग टर्म्स.

**प्रदीप :** शक्य आहे. कारण तसा मी गरजवंत नाहीये.

**कर्नल :** ओ. के. आय ॲडमिट. मी तुम्हाला सर्व स्पष्ट सांगेन. इट इज इन स्ट्रिक्ट कॉन्फिडन्स. तसं स्पष्ट सांगणं अतिशय कठीण आहे...

**प्रदीप :** जस्ट थिंक, तुम्हाला सांगणं इतकं कठीण वाटतंय् मग ते करणं किती कठीण असेल !

**कर्नल :** आय् ॲग्री. मी तुम्हाला स्पष्ट काय ते सांगणाराय. याचं कारण आय लाइक यू. स्मार्ट आहातच. प्रामाणिक असावेत. माझ्या अपेक्षेत बसणारे आहात. असो. मी रिटायर्ड कर्नल आहे. तशी माझी फारशी मोठी इस्टेट नाही. फारसा पत्रव्यवहार नाही. रिटायर्ड माणसाचं लाइफ जगतोय. काही बिझिनेसही करत नाही. या घरात मी, हाउसकीपर लीलाबाई आणि माझी मुलगी चारू. आम्ही तिघेच राहतो. चारूची आई तिच्या लहानपणीच वारली. वीस वर्षांपूर्वी. या घरात तुम्हाला काम काहीच नाही.

**प्रदीप :** मग तुम्हाला गरज काय प्रायव्हेट सेक्रेटरीची ? कशासाठी ?

**कर्नल :** तुम्ही फक्त माझ्या मुलीला— चारूला— तुमची कंपनी द्यायची.

**प्रदीप :** पण... तुमच्या बोलण्याचा अर्थच समजत नाहीये. केवळ कंपनी देण्याकरता तुम्ही महिन्याला पाचशे देणार ? मग तिच्या वयाची एखादी तरुण मुलगी का नाही नेमत ?

**कर्नल :** कारण उघड आहे. तिला पुरुषाचा सहवास देण्याची इच्छा आहे.

**प्रदीप :** तिची का तुमची ?

**कर्नल :** माझी !

**प्रदीप :** पण का ?

**कर्नल :** कारण तिला त्याची गरज आहे. तिच्या वागणुकीतला बदल मला जाणवतोय्. पुरुषाच्या सहवासाचा अनुभव तिला नाही. तिला दूर ठेवलंय मी त्यापासून. पण ते खरं नाही. हे मला केव्हा पटलं सांगू ? जेव्हा ती तरुण पण अतिसामान्य अशा माझ्या ड्रायव्हरकडे आकर्षित झाली तेव्हा ! तिची त्याच्याकडे पाहायची नजरच बदलली आणि मग पुढं काही व्हायच्या आत मी त्या ड्रायव्हरला काढून टाकलं. पण अन्नाचं ताट बाजूला नेलं की भूक थोडीच मिटते ?

**प्रदीप :** पण म्हणून हा उपाय ? त्यापेक्षा लग्न का नाही करत ?

**कर्नल .** अशा मुलीशी कोण लग्न करणार ?

**प्रदीप :** अशा ?

**कर्नल :** लेट मी एक्स्प्लेन...तिची केस मेंटल डिसऑर्डरची आहे...कधी कधी ती चांगली असते, —मला वाटतं बऱ्याच वेळा. मग एकाएकी तिला भीती वाटायला लागते. आणि मग काही वेळानं ती एकदम व्हायोलंट होते. आवरत नाही.

**प्रदीप :** मग त्याच्याकरता......

**कर्नल :** सायकिॲट्रिस झाले, अंगारे-धुपारे, मंत्र-तंत्र, बुवा साधु— हे पण झाले. विश्वास नसताना. नो सक्सेस. मी हार्टचा पेशंट आहे. या जगातून मी केव्हा जाईन हे मला माहीत नाही. मला रिलेटिव्हज् नाहीत, मित्रही नाहीत. माझ्या मरणानंतर तिच्या आयुष्याचे धिंडवडे निघणार हे मला स्पष्ट दिसतंय. एखाद्या वेड्याच्या इस्पितळात तिला नेऊन डांबतील आणि त्या इस्पितळाच्या अजस्र भिंती तिला कणाकणानं खाऊन टाकतील. तिच्या आयुष्यातले तारुण्याचे काही क्षण तरी सुखानं ओथंबून जावेत म्हणून हा सारा व्याप. तुम्ही तिला कंपनी द्यावयाची, तिला सुख द्यायचं, कसंही.

**प्रदीप :** कसंही ?

**कर्नल :** हो, कसंही !

**प्रदीप :** तुमच्या सूचनेचा अर्थ मी काय समजू ?

**कर्नल :** तुम्हाला तो पूर्वीच समजून चुकलाय !

**प्रदीप :** मला समजता कोण तुम्ही ?

**कर्नल :** एक उमदा तरुण !

**प्रदीप :** आय ॲम नॉट ए मेल प्रॉस्ट. मी पुरुष-वेश्या नाही.

**कर्नल :** डोन्ट गेट एक्सायटेड. धिस इज ए रॉंग वे ऑफ थिंकिंग माय बॉय.

**प्रदीप :** आय हॅव टु गिव्ह हर कंपनी. परहॅप्स एव्हरिथिंग. आणि त्याबद्दल तुम्ही मला पैसे देणार ! या सौद्याला दुसरं काय म्हणायचं ?

**कर्नल :** लग्न म्हणजे दुसरं काय असतं ? शरीराची देवाण—घेवाण. कायदेशीर, समाजानं स्वीकारलेली, लग्न या गोंडस नावानं झाकलेली; पण वृत्ती, सौदा, आणि व्यवहार तोच.

**प्रदीप :** तुमचा काही तरी डाव आहे.

**कर्नल :** डावात प्रामाणिकपणानं पानं उघडी करीत नाहीत.

**प्रदीप :** समजा... तुमच्या म्हणण्याप्रमाणं मी वागलो आणि यातून काही प्रॉब्लेम्स् निर्माण झाले तर ?

**कर्नल :** आय नो वॉट यू सजेस्ट. ते मी सोडवीन. स्त्रीला पुरुष नाही मिळाला की त्यातून व्यभिचार निर्माण होतो आणि माझ्या गोड निरागस पोरीनं शरीराच्या नैसर्गिक भुकेसाठी एखाद्या हलकट भंगड माणसाकडे जाणं...आय वुइल हेट इट. शरीराची भूक कुणाला चुकलीय ? तिच्या दुर्दैवानं तिला सर्व-सामान्य मार्गाचे दरवाजे बंद केले आहेत. मी हा मार्ग शोधून काढला तर काय चूक आहे ? सांगा, काय चूक आहे ?

**प्रदीप :** लॉजिकली काही चूक नाही, पण...

**कर्नल :** यू मीन मॉरली ? वॉट इज मॉरल ? टेल मी वॉट इज मॉरल ? उत्तर देता यायचं नाही पटकन. कारण नीती सापेक्ष आहे. बाय द वे, तुमचं लग्न झालंय ?

**प्रदीप :** नाही... पण...

**कर्नल :** दॅटस् फाइन !

**प्रदीप :** का ? तुमच्या मनात कुठं तरी तो हेतू आहे ?

**कर्नल :** ऑनेस्टली नाही. पण तुमच्या मनात संशय का यावा ?

**प्रदीप :** का येऊ नये ?

**कर्नल :** माझ्यावर विश्वास ठेवा.

**प्रदीप :** ओ. के.

**कर्नल :** मग काय ठरवताय् तुम्ही ?

**प्रदीप :** तुमच्याकडून माझी निवड पक्की झाली ?

**कर्नल :** त्याशिवाय तुमचा निर्णय मी विचारला नसता !

**प्रदीप :** निर्णय आताच हवा तुम्हाला ?

**कर्नल :** एनी प्रॉब्लेम ?

**प्रदीप :** मला विचार करायला हवा. निदान एखाद-दुसरा दिवस.

**कर्नल :** ठीक आहे; माझ्याकडून एकच सांगतो, सौद्याचा वास आला तरी हा सौदा नाही. देवानं आयुष्य दिलं, पण स्वतःच्या करमणुकीसाठी त्यातले सुंदर क्षण काढून घेतले. एका अश्राप जीवाला ते उत्कट क्षण मिळवून द्यायचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. थिंक अबाउट इट ॲन्ड देन डिसाइड...

[ इतक्यात दार उघडून चारू वय तेवीस, कोवळ्या निरागस सौंदर्याचा नमुना– आणि पाठोपाठ लीलाबाई प्रवेश करतात. ]

**कर्नल :** कुठं गेली होतीस चारू ?

**चारू :** जवळच गेले होते डॅडी... लायब्ररीत... पुस्तक बदलायला.

**कर्नल :** जाताना मला सांगितलं नाहीस ?

**चारू :** लीलाबाईंना सांगितलं होतं. डॅडी, तुम्ही उगीच घाबरता !

**कर्नल :** उगाच...?

**चारू :** नाही तर काय ? मला माहीत आहे तुम्हांला कसली भीती वाटते ती. पण तसं काही होणार असेल तर, मला आधीच जाणीव होते आणि मी कुठंच बाहेर पडत नाही. आणि डॅडी...( प्रदीपकडे लक्ष जाते आणि एकदम थांबते. )

**कर्नल :** हे प्रदीप देशपांडे. ही माझी मुलगी चारू.

**प्रदीप :** नमस्कार.

**चारू :** नमस्कार.

**कर्नल :** चारू, हे माझे मित्र... आमची नुकतीच ओळख झाली. परहॅप्स ही मे हेल्प मी इन माय वर्क.

**चारू :** बसा ना आपण, उभे का ?

**प्रदीप :** मला ' आपण ' म्हणण्याइतका मी मोठा नाही.

( कर्नल लीलाबाईंना आत जायची खूण करतात. स्वतः उठतात. )

**कर्नल :** एक्स्यूज मी. तुम्ही बसा बोलत मी आलो पाच मिनिटांत. माझं मेडिसिन घ्यायला मी विसरलो. [ जातात. ]

**चारू :** काय करता आपण ?

**प्रदीप :** ' आपण ' नाही. तुम्ही.

**चारू :** ( हसत ठीक आहे तुम्ही.

**प्रदीप :** पीएच्. डी. करतोय.

**चारू :** मग ' आपण 'च.

**प्रदीप :** का ?

**चारू :** मी बी. ए. आहे. एस. एन. डी. टी. ची– ( हसते. ) आलं ना लक्षात ? आणि तीसुद्धा एक्स्टर्नल.

**प्रदीप :** कुठचं पुस्तक आहे ?

चारू : कादंबरी... काकोडकरांची.

प्रदीप : तुम्हाला आवडतात ?

चारू : अतिशय. काकोडकर आणि फडके. तुम्हाला नाही आवडत ?

प्रदीप : नाही. खोट्या असतात त्या.

चारू : मग खरं काय असतं ?

प्रदीप : अं !

चारू : खरं माहीत नसलं की खोटं खरं वाटतं; आणि ते आवडतं; कारण ते सुंदर असतं.

प्रदीप : जग फार वेगळं असतं.

चारू : असेलही. मला माहीत नाही. जग पाहिलंय् कुठं मी ?

प्रदीप : का ? जग जवळून पाहायला तुम्हाला आवडत नाही ?

चारू : माझ्या आवडी-निवडीचा प्रश्नच कधी उद्भवला नाही. माझं जगच लहान आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण मला मित्र-मैत्रिणी मुळीच नाहीत.

प्रदीप : का ?

चारू : आमच्या डॅडींनासुद्धा नाहीत, तर मला कुठून असणार ?

प्रदीप : मग वेळ कसा घालवता तुम्ही ?

चारू : वाचन आणि पेंटिंग...

प्रदीप : ( भिंतीवरील स्केचेस पाहात ) ही स्केचेस तुम्ही काढली ?

चारू : हं !

प्रदीप : सुंदर... खरंच अतिशय सुंदर...

चारू : तुम्हाला आवडली ? (चेहरा खुलतो.)

प्रदीप : वा ! एक विचारू...? ( क्षणभर स्तब्धता )

चारू : विचारा नं.

प्रदीप : सगळ्यात एकच मूड आहे. एकटेपणा— लोनलीनेस. याच्याहून काही तरी वेगळं...

चारू : न जाणवलेलं नाही उतरता येत. पण एक सांगू, मला आज खूप वेगळं वाटतंय्. यालाच आनंद म्हणतात की काय कोण जाणे. पण आज कुणी तरी माझ्या स्केचेसना 'सुंदर' म्हटलं. त्यांचं कौतुक केलं. त्यातला मूड शोधला. त्या स्केचेसनाही आनंद झाला असेल. भिंती ओक्या ओक्या वाटू नयेत म्हणून

खिळ्यावर स्वतःला टांगून घ्यायचं. हाच आपल्या असण्याचा अर्थ समजल्यावर कुढत बसली असतील इतकी वर्षं... खरंच, आय ॲम सो हॅपी ! ( एकदम ) तुम्ही चहा घेणार का ?

**प्रदीप** : स्केचेसची स्तुती केली म्हणून ?

**चारू** : असं नका म्हणू हो...

**प्रदीप** : जस्ट ए जोक... टेक इट लाइटली.

**चारू** : घेणार का ?

**प्रदीप** : काय ?... ओ !... चहा... घेतो की...

**चारू** : लीलाबाई... [ लीलाबाई येतात. ]

**लीला** : काय हवंय...?

**चारू** : जरा चहा करा.

**लीला** : कुणासाठी ?

**चारू** : घरात पाहुणे आलेले तुम्हांला दिसत नाहीत ?

**लीला** : दिसताहेत म्हणूनच विचारतेय. फक्त त्यांच्यासाठी की तुम्ही पण घेणार आहात ?

**चारू** : हे सरळ विचारता येत नव्हतं ?

**लीला** : तुम्हांला प्रत्येक गोष्ट वाकडी दिसते.

**चारू** : म्हणजे दोष माझाच ?

**लीला** : असं कुठं म्हटलं मी ?

**चारू** : वेगळं म्हणायला कशाला हवं ? आणि परक्या माणसांच्या देखत असं वाद घालणं शोभत नाही तुम्हाला.

**लीला** : मला समजतंय मला काय शोभतं ते. पण तुम्ही मात्र आज फारच बोलताय. आणि त्याचं कारण माहीत आहे मला...! ( रोखून पाहतात )

**चारू** : ( त्यांची नजर टाळीत ) तुम्ही जा इथून. तुम्ही जाताय ना ?

**लीला** : मी जातेय, पण त्याआधी एक गोष्ट सांगायची आहे...

**चारू** : कोणती ?

**लीला** : यांच्यादेखत ?

**प्रदीप** : मी बाहेर जातो.

**चारू** : त्याची गरज नाही... सांगा लीलाबाई...

लीला : पुढच्या वेळेला बाहेर जाताना डॅडींना सांगून जा. मला नाही. समजलं ?

चारू : समजलं !

लीला : नाही तर...!

चारू : नाही तर काय ? तुम्ही मला भीती दाखवताय् ?

लीला : नाही तर मला बोलणी बसतील इतकंच म्हणायचं होतं मला......! तुम्ही घाबरलात...?

चारू : नाही...नाही...तुम्ही जा इथून. तुम्ही जा इथून... ( थोडीशी घाबरलेली लीलाबाई. जातात. ) मला ही बाई आवडत नाही...मला ही बाई आवडत नाही...

प्रदीप : केव्हापासून आहेत या तुमच्याकडे ?

चारू : माझ्या लहानपणापासून...

प्रदीप : आणि तरीही...

चारू : अनेक वर्षं जवळ असलेलं माणूस आवडतंच असं नाही...

( घाबरलेली. क्षणभर स्तब्धता.)

प्रदीप : बोला ना काही तरी...

चारू : मला माफ करा, मला जरा बरं वाटत नाही...मी आत जाते.

[ ती आत जाताच कर्नल बाहेर येतात. ]

कर्नल : हे चांगलं झालं की, चारूशीही तुमची भेट झाली. बोलली का ती नीट तुमच्याशी ?

प्रदीप : का ? ती नीट बोलत नाही कुणाशी ?

कर्नल : असं नाही. तिला सवय नाही माणसांत मिसळायची.

प्रदीप : माझ्याशी फार चांगली बोलली. सवय नसताना...

कर्नल : तुम्हाला मी सर्व सांगितलंच आहे.

प्रदीप : तुम्ही न सांगितलेलं मला बरंच समजलंय्.

कर्नल : मी न सांगितलेलं ?

प्रदीप : तुम्हाला कधीच न समजलेलं म्हणून न सांगितलेलं...

कर्नल : तसंही असेल...मला निर्णय कधी कळवणार तुम्ही ?

प्रदीप : मला वाटतं मी निर्णय आताही घेऊ शकेन...

**कर्नल :** ते फारच चांगलं...

**प्रदीप :** मी हे काम...

( इतक्यात आतून चारूची किंकाळी ... सोड मला सटवे...सोड मला... नाही तर मी... लीलाबाईंना न आवरणारी व्हायोलंट झालेली चारू बाहेर येते. लीलाबाईंनी तिला पकडलंय. 'सोड सटवे... सोड... सोड मला ...' )

**चारू :** सोड सटवे... सोड मला— ( लीलाबाईंना धक्का देऊन निसटते ) मला पकडतेस ...? ( ओरडून ) डोळे मोठे करू नकोस... तुझ्या डोळ्यांत मावणार नाही मी...

**लीला :** चारूताई...

**चारू :** दोरी टाक हातातली खाली. सटवी... मला दोरीनं बांधणार आहेस तू...मग चाबकांनी मारणार आहेस... मग तू माझे तुकडे तुकडे करणार. रस्त्यावर फेकून देणार. पुढं नको येऊस... पुढं नको येऊस...

**कर्नल :** चारू...

**चारू :** या बाईला आवरा आधी... तिच्या हातातली दोरी काढून घ्या... काढून घ्या म्हणजे दूर व्हा... दूर व्हा सारीजणं...

**कर्नल :** चारू... स्टॉप इट... आय से स्टॉप इट... !

( चारू थरथरत उभी. हळू हळू चेहरा बदलतो. व्हायोलंटची जागा भीती घेते. आणि कोसळते... लीलाबाई सावरतात. अंधार. )

( पडदा पडतो )

## दृश्य दुसरे

[ प्रकाश येतो तो प्रदीपच्या रूमच्या दृश्यावरती. सिंगल रूम. मोजकं फर्निचर. ब्रह्मचाऱ्याची खोली. अव्यवस्थित असते तशी. इथल्या वस्तूंत पुस्तकांची संख्या अधिक भरावी बेल वाजते. वाजत राहते. आतून 'आलो! आलो!' हे ओरडणं. टॉवेलनं तोंड पुशीत प्रदीप बाहेर येतो. दार उघडतो. दारात सुमित्रा. त्याची मैत्रीण. चेहऱ्यावरून आकर्षक व बुद्धिमान वाटणारी तरुणी. ]

**प्रदीप :** वा, आज इतक्या सकाळी ?

**सुमित्रा :** साहेब, वाजले किती ?

**प्रदीप :** साडेनऊ...

**सुमित्रा :** साडेनऊ म्हणजे इतक्या सकाळी ?

**प्रदीप :** ब्रह्मचाऱ्याची म्हणजे माझ्यासारख्या हनुमानशिष्य नसलेल्या, पहाट सकाळी आठला होते. म्हणजे आता हिशेब कर.

**सुमित्रा :** रात्री जागत बसला होतास ?

**प्रदीप :** हं... आता काय करणार ?

**सुमित्रा :** चावटपणा पुरे... अभ्यास करीत होतास का ?

**प्रदीप :** खरं सांगू? रात्री झोप आली नाही म्हणून जागा होतो. आता झोप का आली नाही...

**सुमित्रा :** हे बघ, मला फालतू कारणं नको आहेत. जर का तू या वर्षी थिसीस कंप्लीट केला नाहीस आणि जर पीएच. डी. मिळाली नाही ना तर...

**प्रदीप :** तुझी आर्थिक मदत सोडून टाकीन.

**सुमित्रा :** ( कळवळून ) असं नाही रे...

**प्रदीप :** ए वेडी... लगेच गोरीमोरी झालीस. हे बघ, तुझी चेष्टा केली मी.

**सुमित्रा :** पुन्हा अशी चेष्टा नको करूस...

**प्रदीप :** रागावलीस...ए...इकडे बघ ना...इतकं रागवायचं ?

**सुमित्रा :** हे बघ...' आर्थिक मदत ' वगैरे काही बोललास ना कधी तर मला फार वाईट वाटेल. अपमान वाटेल...

**प्रदीप :** चुकलो बाईसाहेब, आता तरी माफ करा. पण खरं सांगू सुमित्रा, तुझ्या हट्टामुळे मी पीएच्. डी. करतोय्. डॉक्टरेट मिळवणाराय् तुझ्यामुळे. तुझा आधार आहे मला. तू नोकरी करायचीस आणि माझे खर्च भागवायचेस. कधी कधी मला लाज वाटते.

**सुमित्रा :** तुला लाज वाटत असली तर मी नाही करणार मदत. तुझा स्वाभिमान आड नको यायला.

**प्रदीप :** तसं नाही सुमित्रा......

**सुमित्रा :** पुरे झालं.../..सकाळी सकाळी माझा मूड नको अप्सेट करूस.

**प्रदीप :** तुला आज ऑफिस नाही ?

**सुमित्रा :** दोन लेट अजून शिल्लक आहेत माझे. काल सबंध दिवस कुठे रे होतास तू ?

**प्रदीप :** ओ गॉड ! विसरूनच गेलो बघ. इतकं महत्त्वाचं आणि विसरून गेलो. काल मी कुठं गेलो होतो असेन ?

**सुमित्रा :** हे बघ, तू फोडी घालू नकोस. चटकन सांगून टाक.

**प्रदीप :** काल मी इंटरव्ह्यूला गेलो होतो.

**सुमित्रा :** तुला मी लाख वेळा सांगितलंय्, पीएच. डी. मिळेपर्यंत तू नोकरी करायची नाहीस. सांगितलंय् ना ? मग का गेलास तू इंटरव्ह्यूला ? काय गरज होती, सांग मला.

**प्रदीप :** बाईसाहेब, लग्नाच्या आधीच इतकी मला ताणायला लागलीस ? आणि तू एकदा बोलायला लागलीस की आवरत नाहीस. मला जरा बोलून देशील का ?...अं... ? पार्ट-टाइम जॉब केला तर हरकत नाही असं तू एकदा म्हणाली होतीस, आठवतं ?

**सुमित्रा :** हो...

**प्रदीप :** त्यासाठी गेलो होतो. प्रायव्हेट सेक्रेटरीचा जॉब होता.

**सुमित्रा :** होता म्हणजे ?

**प्रदीप :** मी ' नाही स्वीकारायचं ' असं ठरवलंय्.

**सुमित्रा :** पगार कमी असेल ?

**प्रदीप :** कमी ? महिन्याला पाचशे रुपये !

**सुमित्रा :** रिअली...मग ' नाही ' का ठरवलंस ?

**प्रदीप :** त्या घरातली परिस्थिती फार विचित्र आहे सुमित्रा. वाटतं तसं सरळ काम नाहीये, उगाच कुणी कुणाला या जमान्यात महिना पाचशे पगार देत नाहीत. बाप रिटायर्ड कर्नल. आई नाही. घरात एक हाउस कीपर आणि एक तरुण मुलगी. कंप्लीट सायकॉलॉजिकल केसचा—भीतीचा जबरदस्त पगडा असलेली आणि त्यातूनच कधी कधी व्हॉयलंट होणारी. आणि मी...माझं काम... मी त्या मुलीला...नाही, मला जमायचं नाही...

**सुमित्रा :** मला समजलं...

**प्रदीप :** नाही सुमित्रा...तुला काही समजलेलं नाही...काही समजणार नाही...इटस् ए डिफिकल्ट प्रॉब्लेम...

**सुमित्रा** : मग काय झालं ?

**प्रदीप** : मग काय झालं... ? सुमित्रा, तुला समजत नाही. तुला मी, कसं समजावून सांगू...तिच्या बापाची इच्छा आहे की मी...

**सुमित्रा** : तिला प्रेम देऊन माणसात आणावं...तू बोलताना अडखळलास तेव्हाच मी हे ओळखलं...

**प्रदीप** : तितकंच नाही ते सुमित्रा...

**सुमित्रा** : माझी हरकत नाही.

**प्रदीप** : सुमित्रा...

**सुमित्रा** : एक सायकॉलॉजिकल केस म्हणून तू हा जॉब स्वीकारायला हवास. तू सायकॉलॉजीचा स्टूडंट आहेस. अशी केस मिळाली हे भाग्य समजायला हवंस तू. व्हाय डोन्ट यू ट्राय ?

**प्रदीप** : यातून कदाचित भलते प्रश्न निर्माण होतील.

**सुमित्रा** : का... ?

**प्रदीप** : काही नाही...

**सुमित्रा** : मला माहीत आहे, तुला काय म्हणायचंय् ते. तुझी सुमित्रा इतक्या कोत्या मनाची नाही. एक पेशंट म्हणून त्या मुलीला बरं करण्याकरता तू काही केलंस तरी माझी हरकत नाही. माझा विश्वास आहे तुझ्यावर. यू ॲक्सेप्ट इट...

**प्रदीप** : मनापासून सांगते आहेस... ?

**सुमित्रा** : अगदी मनापासून...माझं नेहमी ऐकतोस ना ?

**प्रदीप** : या वेळेला पण ऐकेन. ओ. के. डिअर !

**सुमित्रा** : फाइन ! पण हे नक्की ना ?

**प्रदीप** : नक्की...

**सुमित्रा** : तुला असं नाही ना वाटत, की...

**प्रदीप** : बोल ना, अडखळलीस का ?

**सुमित्रा** : काही नाही...

**प्रदीप** : काय मनात आलंय्...

**सुमित्रा** : तुला असं नाही ना वाटत, की मी तुला हा जॉब स्वीकारायला सांगितला तो... माझ्यावरचा भार कमी व्हावा म्हणून...

**प्रदीप** : हो...

**सुमित्रा** : प्रदीप...

**प्रदीप** : तुझी चेष्टा पण करायची नाही का ग ?

**सुमित्रा** : मला नाही भलती चेष्टा आवडत. चल... मी, निघते आता...

**प्रदीप** : निघालीस ? इतक्या लवकर ?

**सुमित्रा** : लेट जायचंय्. हाफ डे नाही. ( जायला निघते. वळते. ) नक्की ॲक्सेप्ट करणार ना ?

**प्रदीप** : हो, हो... किती वेळा विचारशील ?

( दारावर टकटक. दार लोटलं जातं. दारात कर्नल उभे. )

**कर्नल** : मे आय कम इन् ?

**प्रदीप** : तुम्ही...? या ना... या या...

**कर्नल** : हॅव आय डिस्टर्बड् यू ?

**प्रदीप** : नॉट ॲट ऑल... सुमित्रा, हे कर्नल राजे. काल मी यांच्याकडे गेलो होतो. ही सुमित्रा– माय फ्रेंड...

**कर्नल** : नमस्कार... !

**सुमित्रा** : एक्सक्यूज मी... मी निघते... मला निघायला हवं...

**कर्नल** : आम्हांला काही खाजगी बोलायचं नाहीय.

**सुमित्रा** : म्हणून नाही... मला ऑफिसला उशीर होईल...

**प्रदीप** : ती नोकरी करते.

**कर्नल** : ओ !...आय सी ! मला उगीचच गिल्टी वाटतंय्...

**प्रदीप** : का ?

**कर्नल** : मला वाटतं मी आलो म्हणून त्या निघाल्या !

**सुमित्रा** : खरंच तसं नाही...

**कर्नल** : नक्की...

**सुमित्रा** : नक्की. ओ. के. प्रदीप, दुपारी मला ऑफिसात फोन करायला विसरू नकोस...

**प्रदीप** : ओ. के.

[ सुमित्रा जाते. ]

**कर्नल** : इथं तुम्ही राहता ?

**प्रदीप** : हं, आहे आपला गरीबाचा राजवाडा.

**कर्नल** : त्या अर्थानं नाही म्हटलं मी.

**प्रदीप** : कबूल, इथं मी एकटा राहतो. तसा या जगातच मी एकटा आहे. आई-वडील लहानपणीच वारले. मामांनी मॅट्रिकपर्यंत शिकवलं. पुढचं शिक्षण बारीकसारीक घरं करून केलं.

**कर्नल** : असं ? आणि सुमित्रा ?

**प्रदीप** : तिला इथं राहायला यायला अजून अवकाश आहे.

**कर्नल** : अच्छा...! तुम्हाला एक विचारू ?

**प्रदीप** : काय ?

**कर्नल** : नोकरी न करता तुम्ही पुढचं शिक्षण करताय्...

**प्रदीप** : त्याचा खर्च कोण करतं, हेच विचारायचंय् ना तुम्हाला ? माझा सर्व खर्च सुमित्रा— माझी बायको करते.

**कर्नल** : जरा विचित्र वाटतं नाही...?

**प्रदीप** : म्हणजे तिनं असं का करावं...? तुम्हाला पटणार नाही, पण सांगतो... आपण प्रत्येक गोष्ट कुठं तरी अपेक्षांशी जोडतो. पण जगात अशीही काही माणसं आहेत की, ज्यांना स्वतःला उडता येणं शक्य नसतं पण हौस असते दुसऱ्यांना पंख देण्याची... आणि तीही केवळ आनंदासाठी. माझी मैत्रीण तशी आहे. फार जुनी मैत्रीण. माझ्यावर अतिशय प्रेम करणारी... तुम्हाला माझी नेमणूक करावीशी वाटते...?

**कर्नल** : मला ‘ मॅरिड ’ माणूस नकोय्. दॅटस् ऑल !

**प्रदीप** : का...?

**कर्नल** : माझ्या अपेक्षा तो पुऱ्या करू शकणार नाही. तो कदाचित अपेक्षा पुरी करू शकेल त्याच्यापाठीमागची भावना न जाणता. अँड देन इट विल बी नथिंग; बट...

**प्रदीप** : मेल प्रॉस्टिट्यूशन... करेक्ट...?

**कर्नल** : डोन्ट यूज दॅट वर्ड...

**प्रदीप** : कृतीला तुम्ही घाबरत नाही आणि शब्दाला का घाबरता ?

**कर्नल** : घाबरत नाही. पण तो योग्य शब्द नाही... आणि हो, विचारायला मी मुद्दाम आलोय्... काय ठरवलंत...

**प्रदीप :** ठरघलंय् कालच... मी स्वीकारू शकणार नाही...

**कर्नल :** का ?

**प्रदीप :** तुमच्या सगळ्या इतर अपेक्षा, अटी मान्य आहेत मला.

**कर्नल :** मग अडचण काय ? पगार...

**प्रदीप :** पैशाचा प्रश्न नाही... त्याची लालच मला नाही. मी श्रीमंत नाही. पण पैशानं मला संपूर्ण विकत घेता येईल इतका स्वस्तही नाही. होणारही नाही. मला स्वतःला विकत द्यायचं नाही. कारण तुमची मुख्य अपेक्षा मला मान्य नाही. तुमच्या मुलीला मी प्रेम देऊ शकेन. मनापासून; पण सौदा म्हणून नाही. तिला त्याची गरज आहे म्हणून. आणि मलाही कणव वाटते म्हणून. आय विल ट्रीट हर ॲज ए पेशंट. तिला आत्मविश्वास मिळवून देईन. प्रेम मिळवून देईन. तिला माणूस बनवीन. दॅट्स् ऑल. नथिंग मोअर. आणि हे तुमच्या अपेक्षांत बसायचं नाही...

**कर्नल :** शरीरसुख... हे जीवनातलं सर्वोच्च सुख समजतोय मी. ती माझी फिलॉसॉफी आहे.

**प्रदीप :** प्रेमाशिवाय ?

**कर्नल :** ( हसतात ) एक सांगू ? अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. मी त्याला युनिवर्सल ट्रुथ समजतो. जगातले सर्व संसार निरखून पाहा. प्रेमानं शरीरसुख किती जणांना मिळतं... आणि किती काळ ? यू आर स्टिल यंग. उत्तर शोधेपर्यंत केस पांढरे होतील. आणि शोधलेल्या उत्तराला तेव्हा काही अर्थ असणार नाही. तुमची तेवढीच हरकत असेल तर आय डू नॉट इन्सिस्ट ऑन दॅट कंडिशन... रादर आय कान्ट. मग तर तुमची काही हरकत नाही...?

**प्रदीप :** नाही.

**कर्नल :** ठीक आहे. तुम्ही उद्यापासून येऊ शकता. तुम्ही तुमच्या कल्पनेप्रमाणं; तुमच्या मताप्रमाणे तुम्ही तिच्याशी वागू शकता. मी तुम्हाला विचारणार नाही. तसंच तुम्ही केव्हाही सोडून जाऊ शकता. तेही बंधन तुमच्यावर नाही. तुम्ही तिला बरी केलीत तर नथिंग लाईक दॅट. आय विल बी हॅपी. तुमच्या सगळ्या अटी मी मान्य केल्या आहेत. कारण तुम्ही मला आवडलात. तुमची

मतं चुकीची असली तरी तुमच्या दृष्टीनं ती प्रामाणिक आहेत. मी ती मानतो. सो– नाऊ यू ॲक्सेप्ट. ( हात पुढे करतात. )

प्रदीप : आय डू.

कर्नल : थँक्यू... मी निघतो. जाता जाता एकच सांगतो. माझा एका गोष्टी-वरती ठाम विश्वास आहे. फुलाचा सुगंध मनात भरला की पाकळ्यांना स्पर्श करायला हात आपोआप पुढं होतात. डोन्ट फरगेट दॅट.

( पडदा पडतो. अंधार. )

## दृश्य तिसरे

[ प्रकाश येतो तो कर्नल साहेबांच्या घराच्या दिवाणखान्यावर. रंगभूमीवर कुणीही नाही. कर्नलसाहेब बाहेरून येतात. ते मॉर्निंग वॉकला गेले असावेत. टेबलावरचा पेपर घेऊन आत जायला निघतात तो लोखंडे येतो. ]

**लोखंडे :** गुड मॉर्निंग सर !

**कर्नल :** गुड मॉर्निंग. तुम्ही लवकर आलात. का मला फिरून यायला उशीर झाला ?

**लोखंडे :** मीच अर्धा तास लवकर आलो. म्हटलं तुम्ही एवढं आठवणीनं बोलावलंत. आपल्याकडून उशीर नको.

**कर्नल :** कशाकरता बोलावलं असेल तुम्हाला ?

**लोखंडे :** कशाकरता ?

**कर्नल :** तुमच्या करता एक नोकरी शोधलीय.

**लोखंडे :** अहो, काय सांगता काय ? खरंच ?

**कर्नल :** खरंच. तशी काही फारशी ॲट्रॅक्टिव्ह नाही. पण बेकार बसण्यापेक्षा निश्चितच बरी. निदान तात्पुरती.

**लोखंडे :** कसली नोकरी आहे ?

**कर्नल :** लायब्ररी असिस्टंट. हे बघा, पगार फारसा नाही. कारण ती लायब्ररी चॅरिटेबल इन्स्टिट्युटची आहे.

**लोखंडे :** सर, पगाराचं काय एवढं घेऊन बसलात. आपणहून कोणीही नोकरी देतोय हा केवढा आनंद. निदान अर्जाचं पोस्टेज आणि इंटरव्ह्यूकरता गाडीभाडं तरी यापुढं वडलांकडे मागायला नको, हे काय कमी आहे? खरं सांगतो सर, माझे वडील फार सहनशील व समजूतदार आहेत. म्हणजे मध्यमवर्गीय माणसाला हे गुण आपोआपच येतात म्हणा. पण माझे वडील फारच. एकदा आई मला चिडून म्हणाली— अरे, निदान बी. ए. ला सेकंड क्लास यायचं— तर वडील म्हणाले— याचा काय दोष? तू चार इयत्ता अन् मी मॅट्रिक. पोरगं काय स्कॉलर होणार? माझं मॅट्रिक प्लस तुझी चार वर्षं यांची बेरीज बी. ए. शिवाय काय होणार?

**कर्नल :** अहो लोखंडे, तुम्ही भलतेच खूष झालेले दिसता.

**लोखंडे :** सर, बेकाराला नोकरी मिळाल्यावर होणारी खुषी समजायला आमच्या पिढीत जन्म घ्यायला हवा बरं. बरं, कुणाला भेटायचं ते सांगा.

**कर्नल :** तुम्ही भाऊसाहेब आगरकरांना ही चिठ्ठी द्या. त्यांच्याशी मी बोललो आहे. हा त्यांचा पत्ता. तुम्हाला लगेच रुजू व्हायला सांगतील.

**लोखंडे :** सर, एक विचारू? म्हणजे ही नोकरी पुढं-मागं सोडून दिली तर चालेल ना?

**कर्नल :** न चालायला काय झालं? लोखंडे, ही नोकरी तात्पुरती आहे. आपल्याला यापेक्षा चांगली नोकरी मिळवायची आहे. तुम्ही सतत खटपट करीत रहा. काही अडचण आली तर मला सांगा.

**लोखंडे :** तुमचे आभार कसे मानावेत तेच मला समजत नाही.

**कर्नल :** मग मानू नका.

**लोखंडे :** बरं, मी निघतो आता.

**कर्नल :** एवढी घाई काय आहे?

**लोखंडे :** घाई अशी नाही, पण आगरकरसाहेबांना वेळच्या वेळी भेटतो. म्हणजे उशीर झाल्यामुळं हातची नोकरी जायला नको.

**कर्नल :** ओ. के. ऑल द बेस्ट!

**लोखंडे :** मग सावकाशीनं भेटतो आपल्याला... [ जातो. ]

[ कर्नल वर्तमानपत्र घेतात, आत जायला निघतात, लीलाबाई येतात. ]

**लीला :** जरा एक सांगायचंय्.

**कर्नल :** काय ?

**लीला :** चारुताईंना सांगा जरा.

**कर्नल :** का ?... काय झालं ?

**लीला :** हल्ली माझं ऐकत नाहीत त्या.

**कर्नल :** कधीपासून... ?

**लीला :** कालचीच गोष्ट. ' माझ्या रूममध्ये मी स्केचेस काढीत असताना तुम्ही पाऊल टाकू नका. तुमची सावलीसुद्धा मला आवडत नाही ' असं म्हणाल्या...

**कर्नल :** तुम्ही तिला डिस्टर्ब केलं असेल.

**लीला :** त्याला नाइलाज आहे माझा. मी फक्त माझं कर्तव्य करीत होते. त्यांची काळजी घेण्याकरता तुम्ही मला पगार देता. उद्या काही बरंवाईट झालं तर दोष मला लागेल...

**कर्नल :** ( क्षणभर थांबून ) चारू...ए चारू...[ चारू येते. ] लीलाबाईंची तक्रार आहे तुझ्याबद्दल...

**चारू :** मला माहीत आहे त्यांना फक्त तक्रार करता येते.

**कर्नल :** तुझ्या रूममध्ये तू त्यांना येऊ नको म्हणून सांगितलंस...

**चारू :** त्या आल्या की मी डिस्टर्ब होते.

**कर्नल :** का ?

**चारू :** कारण... ( लीलाबाईंकडे दृष्टी जाताच गप्प बसते. )

**कर्नल :** मीच त्यांना तुझ्या पाठीशी रहायला सांगितलंय्.

**चारू :** सावलीसारखं ? ( ओरडून ) कधीच वेगळ्या न होणाऱ्या काळ्या सावलीसारखी...माझं अस्तित्व गिळून टाकणाऱ्या लांबलचक सावलीसारखं... तुमच्या सावलीची नुसती जाणीव झाली तरी मी थरारते...कोसळते...

**कर्नल :** शांत हो बेटा चारू...तुझ्याच चांगल्याकरता हे आहे...तू उगाच गैरसमज करून घेते आहेस.

**चारू :** मी उगाच गैरसमज करून घेतेय् ?

**लीला :** नाही तर काय...एकदम तुम्हाला झटका आला...

**चारू :** झटका ? कशाचा ? वेडाचा ? कोण म्हणतं मी वेडी आहे ? का पुन्हा पुन्हा मला त्याच गोष्टींची आठवण करून देता ? माझ्या विश्वात मी कुठं

तरी रमायचा प्रयत्न करते. मला भीती वाटते. मी बेभान होते हे विसरायला. झगडते. आणि तुम्ही पुन्हा पुन्हा आठवण करून देता. ती ठिणगी जागवता... का ? कशासाठी ?

**कर्नल :** स्टॉप धिस, रबिश ! तुझी काळजी घेतल्यानं तुला त्रास होतो म्हणून तुझी काळजी घ्यायची नाही ? सांग. तुझ्यावरती कमी उपचार केले आहेत ? डू थू गॅरेन्टी की पुन्हा तुला कधी भीती वाटायची नाही ? पुन्हा कधी तू बेभान होणार नाहीस ? सांग. ( मानेनेच नाही म्हणते. ) मग, तुझी काळजी घ्यायला नको ? आणि ती घेताना तुला त्रास झाला तर यू हॅव टु ॲडजस्ट.

**चारू :** ॲण्ड इफ आय कान्ट...

**कर्नल :** तू मला सांग...

**चारू :** तुम्हांला...?

**कर्नल :** काय हरकत आहे ? ( ती गप्प ) बोल... गप्प का ?

**चारू :** काही नाही...

**कर्नल :** चारू, तुझ्या मनात काय आहे ?

**चारू :** काही नाही डॅडी...

**कर्नल :** नाही, चारू...तुला काय सांगायचंय् ते मोकळेपणानं सांग.

**चारू :** मोकळेपणानं ?

**कर्नल :** मी परका वाटतो तुला ?

**चारू :** हो डॅडी...तुम्ही मला नेहमीच परके वाटत आलात. प्रयत्न करूनही कधी मी तुमच्याशी मोकळेपणानं बोलू शकले नाही डॅडी. माझी आई गेली तेव्हा मला बोलता येत नव्हतं. आणि बोलता यायला लागल्यावर बोलायला कुणी नव्हतं. डॅडी, माणसाला आपल्या मनातलं कुणाला तरी सांगावंसं वाटतं. मी तुमच्याशिवाय दुसऱ्या कुणाला सांगणार ? तुम्हांला कधी असं नाही वाटलं की, आपल्या मुलीला आपल्याला काही सांगायचं असेल, काही विचारायचं असेल. मला बोलता यायला लागल्यावर मला तुम्हांला विचारायचं होतं, ' डॅडी, माझी आकाशातली आई कशी होती ते ? ' हा प्रश्न जसा मनातच गोठून गेला तसे अनेक प्रश्न असेच गोठून गेलेले. डॅडी, देवानं दोन शब्द निर्माण केले ते दुसऱ्याला समजून घेण्याकरता शब्दकोशाकरता नाही. ( क्षणभर स्तब्धता ) डॅडी, मी फार बोलले. तुम्ही रागावलात ?

**कर्नल :** नाही !

**चारू :** मग गप्प का झालात ?

**कर्नल :** विचार करतोय्... तुझ्या बोलण्यावर.

**चारू :** थँक्यू ... डॅडी, आय विल ट्राय टु ॲडजस्ट; पण एकच गोष्ट लीलाबाईंना तुम्ही कायमचं सांगून टाका.

**कर्नल :** त्यांना काय सांगायचं ते मी सांगेन. ओ. के. !

**चारू :** ( शान्त होत ) ओ. के. !

**कर्नल :** काय करीत होतीस आता ?

**चारू :** स्केचेस काढीत होते.

**कर्नल :** ओ. के. तू जा तुझ्या रूममध्ये. गो अहेड, विश युवर फ्री.

[ चारू जाते. लीलाबाई जायला निघतात.]

**कर्नल :** थांबा तुम्ही. लीलाबाई तुम्हीसुद्धा...

**लीला :** काय करायला हवं ?

**कर्नल :** इतकी नफरत का तिला तुमच्याविषयी ? तुम्ही जरा प्रेमानं घेतलंत तर ?

**लीला :** बेभान माणसाला प्रेमानं आवरता नाही येत.

**कर्नल :** आणि परवा ?... ( लीलाबाई गप्प ) तुम्ही तिच्या फार मागंमागं राहू नका.

**लीला :** आणि काही झालं तर... ?

**कर्नल :** खात्री असल्यासारखं बोलताहात !

**लीला :** काही झालं तर मी जबाबदार नाही.

**कर्नल :** ठीक आहे. दुसरी गोष्ट. काल आलेले तरुण प्रदीप देशपांडे त्यांचं नाव; माझे मित्र. त्यांना मी प्रायव्हेट सेक्रेटरी नेमलंय्. ते केव्हाही येतील; जातील. घरच्यापैकीच एक समजले जातील. त्यांना कुणीही काहीही विचारता कामा नये. आलं लक्षात ... ?

**लीला :** ठीक आहे.

**कर्नल :** तुम्ही जाऊ शकता. ( लीलाताई तशाच उभ्या ) काही अडचण आहे ?

**लीला :** राहवत नाही म्हणून एक सुचवायचंय्.

**कर्नल** : कशासंबंधी ?

**लीला** : कुठला कोण माणूस ... ना ओळख, ना देख ... तो इथं घरच्यासारखा वागणार ?

**कर्नल** : काय हरकत आहे ?

**लीला** : चारूचा विचार केलाय् ?

**कर्नल** : संपूर्णपणे. आणि या गोष्टीशी तुमचा संबंध काय ? तुम्ही हे घर सांभाळा. सांभाळत असाल; पण या घराच्या मालकिणीची सर तुम्हाला यायची नाही.

**लीला** : या घराच्या मालकिणीशी माझी तुलना केलेली मला खपायची नाही ... मी तशी...

**कर्नल** : तुम्ही या घराची मालकीण नाही.

**लीला** : तसं मीही मानत नाही.

**कर्नल** : पण वागता मात्र तशा. चारूवरती तुमचा काय अधिकार ?

**लीला** : म्हटलं तर प्रत्येक गोष्टीवर माझा अधिकार आहे.

**कर्नल** : पूर्वी तुम्ही इतक्या बोलत नव्हता.

**लीला** : वर्षे वाढतात तशी कडवटपणाची पुटंही वाढतात.

**कर्नल** : उगाच नाही चारू तुमचा द्वेष करीत ?

**लीला** : तुम्हीही काय वेगळं करता ?

**कर्नल** : वीस वर्षांपूर्वी तुम्हांला नेमलं हीच चूक केली मी.

**लीला** : तुम्ही ती चूक सुधारू शकता !

**कर्नल** : आय हेट मायसेल्फ फॉर दॅट. मी तुम्हाला एवढं महत्त्व का दिलं ? का तुमची पर्वा केली ? का तुमची दया येऊन तुम्हाला नोकरी दिली... कशासाठी...?

**लीला** : या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर तुम्हाला माहीत आहे. ( थांबतात ) ब्रेकफास्ट कुठं घेणार आहात ?

**कर्नल** : ( उठत ) माझ्या स्टडीमध्ये आणा. मी तिथंच बसतोय.

[ कर्नल जातात. क्षणभर रंगभूमीवर कुणीही नाही. लीलाबाई कर्नलसाहेबांच्या दिशेने पाहात असतात. त्या कसला तरी विचार करीत असाव्यात. थोड्या वेळानं त्याही आत जातात. ]

(दारावरची बेल वाजते.)

**चारू :** (आतून) लीलाबाई... लीलाबाई... बाहेर बघा कोण आलंय् ते. (बेल वाजतच राहते. बाहेर येत– ) कुठं गेल्या कोण जाणे! (दार उघडते. दारात प्रदीप...) अय्या !... तुम्ही...?

**प्रदीप :** गुड मॉर्निंग...

**चारू :** या ना... आत या...

**प्रदीप :** काय म्हणतेय तुमची तब्येत...?

**चारू :** छान आहे की... मला काय झालंय ? (थांबते.) म्हणजे काल जेव्हा मी... तेव्हा तुम्ही होता इथं...?

**प्रदीप :** हो... का...?

**चारू :** तरी तुम्ही आज आलात ?

**प्रदीप :** का ? काय झालं ?

**चारू :** तुम्हाला भीती नाही वाटली माझी ? निदान तिरस्कार... किळस ?

**प्रदीप :** यातलं मला काहीच वाटलं नाही... उलट तुम्हाला पुन्हा भेटावंसं वाटलं... खूप...

**चारू :** मला का डॅडींना ?

**प्रदीप :** काय उत्तर दिलं की तुम्हाला खूप बरं वाटेल ? – ते माझं उत्तर.

**चारू :** उत्तर नाही दिलंत तरी चालेल. तुम्ही आलात मला खूप बरं वाटलं.

**प्रदीप :** मी नेहमी येणाराय्. आता डॅडींना त्यांच्या कामात मदत करायला.

**चारू :** खरंच ?

**प्रदीप :** अगदी खरं...मघाशी बरं वाटलं. आता काय वाटलं ?

**चारू :** आनंद...

**प्रदीप :** आनंद कसा असतो, काय असतो... तुम्हाला माहीत आहे ?

**चारू :** माहिती होतोय् असं वाटतंय्...

**प्रदीप :** मला नाही वाटत...

**चारू :** म्हणजे ?

**प्रदीप :** तुम्हाला खरंच आनंद झाला असेल, तर मला एक स्केच काढून द्या. या स्केचच्या विरुद्ध...हे उजाड माळरान आणि त्यावरचं एखाद्या फिकट क्षयरोग्यासारखं हे एकान्ती निष्पर्ण झाड...त्याच्याऐवजी पाचूच्या बेटासारखी

हिरवळ आणि त्यावर एक पानाफुलांनी बहरलेला डेरेदार वृक्ष. द्याल असं स्केच काढून... ?

**चारू :** जरूर... !

**प्रदीप :** प्रॉमिस... ( तो हात पुढे करतो. ती क्षणभर गोंधळते. हात पुढे करते. तिच्या हातात तो हात गुंतवतो. त्या उबदार स्पर्शानं ती शहारते; सुखावते. भानावर येताच दूर होते. गप्प... ) बोला... काही तरी बोला ना...मला वाटतं मीच एकटा बोलतोय्...तुम्ही काहीच बोलत नाही...

**चारू :** माझ्यापाशी बोलण्यासारख काही नाहीये.

**प्रदीप :** शक्यच नाही...कलाकाराकडे बोलण्यासारखं खूप असतं. नवीन नवीन कल्पना...नवीन योजना...खूप...

**चारू :** मला एकदम कलाकार करून टाकलंत तुम्ही...

**प्रदीप :** तुम्ही नाही आहात ?

**चारू :** मी एक सामान्य भित्री मुलगी आहे.

**प्रदीप :** तुम्ही सामान्य नाही. समजलं ? एक दुसरा माणूस तुम्हाला सांगतोय् तुम्ही सामान्य नाही. म्हणजे ते खरं आहे. आपण सामान्य आहोत ही कल्पना डोक्यातून काढून टाका. कायमची. आणि जी माणसं सामान्य नसतात ती कधीच कुणाला भीत नाहीत. तुम्हाला कशाची भीती वाटते ? कुणाची ?

**चारू :** कशाची नाही ? खरंच कुणाचीच नाही...

**प्रदीप :** खोटं...तुमचा चेहराच सांगतोय् तसं.....( स्तब्धता ) नाही सांगायचं ? नका सांगू ! ( टेबलावरचं पुस्तक उचलीत ) कादंबरी किती वाचून झाली ?

**चारू :** चार-पाच प्रकरणं... !

**प्रदीप :** आवडली ?

**चारू :** खूप...

**प्रदीप :** का ?

**चारू :** सगळं कसं छान असतं. त्यात सुंदर वातावरण. निर्भय माणसं. प्रेमानं निथळणारी त्यांची आयुष्यं...कसं एका छानशा संगमरवरी स्वप्नासारखं कधी न पाहायला मिळणारं...

**प्रदीप :** तुम्ही खूप भाबड्या आहात...

**चारू** : काय झालं ?

**प्रदीप** : फार छोटं जग पहिलंय् तुम्ही. स्वप्नच्यां दुनियेत इतक्या रमता ?

**चारू** : मग कशात रमायचं ? माझ्या खऱ्या जगात ? ( वळते; दारात लीलाबाई ) लीलाबाई तुम्ही ? का आलात तुम्ही इथं ? नेमक्या वेळी ?

**लीला** : नेमक्या वेळी म्हणजे काय म्हणायचंय् तुम्हाला ?

**चारू** : तुम्ही का आलात इथं ?

**लीला** : चहाचं विचारायला...काही चुकलं ?

**चारू** : चहा नकोय् आता...

**लीला** : यांना पण ?

**प्रदीप** : मलाही चहा नकोय. [ लीलाबाई क्षणभर थांबून जातात ] ( चारूला ) लीलाबाई गेल्या...

**चारू** : ( दचकते ) गेल्या...?

**प्रदीप** : एवढं घाबरायला काय झालं ?

**चारू** : हो, मला भीती वाटते...मी घाबरते...मी आनंदात असले की ते दोन डोळे मला शोधत माझा पाठलाग करत येतात. एक सावली माझ्याभोवती माझा पदर धरत फिरत असते. त्या सावलीची मला शिसारी येते......किळस येते...आणि मी आक्रसते...त्या सावलीच्या मिठीतून जायची धडपड करते. आणि ती सावली मोठी होत जाते. ते दोन डोळे मला शोधतच असतात. माझा पाठलाग करत असतात. आणि मग जिकडे तिकडे मला फक्त ते दोन डोळे दिसायला लागतात. या घरात प्रत्येक वस्तूला डोळे फुटतात.....असंख्य डोळे...रोखून पाहणारे, मला शोषून घेणारे...मी घाबरते. उन्मळून जाते. आणि जीवाच्या आकान्तानं त्यांच्या पकडीतून निसटायचा प्रयत्न करते, आणि बेभान होते. ओरडते– मला सोड...मला सोड...सटवे मला सोड...

( शेवटच्या वाक्याला कर्नल आणि लीलाबाई दारात उभ्या.)

**कर्नल** : ( ओरडतात. ) स्टॉप इट ! ... चारू... आय से स्टॉप इट ! ( चारू भानावर येते. ) लीलाबाई, हिला आत घेऊन जा.

[ लीलाबाई चारूला आत घेऊन जातात. ]

**प्रदीप** : एक्स्क्यूज मी. बट धिस इज नॉट द वे.

**कर्नल** : काय झालं ?

**प्रदीप** : तुम्हांला राग नाही ना येणार सांगितलं तर ?

**कर्नल** : कशाचा ?

**प्रदीप** : तिच्या अंगावर असं ओरडायची गरज नव्हती.

**कर्नल** : त्याशिवाय ती भानावर आली नसती.

**प्रदीप** : कशावरून ? दुसरेही काही मार्ग असतात हे तुम्हांला माहीत आहे ? कधी प्रयत्न केलाय् ? मला खात्री आहे कुणी कधी तसा प्रयत्न केला नाही. आणि झाली बेभान तर काय बिघडलं ?

**कर्नल** : काय बिघडलं ? बिघडायची वाट पाहायची ?

**प्रदीप** : तिची टेन्शन्स, तिची भीती तशीच आतल्या आत राहाते. त्याचं काय ? एक विनंती आहे.

**कर्नल** : काय ?

**प्रदीप** : पुन्हा अशी वेळ आली तर तिच्या भावनांचा उद्रेक थांबवू नका...

**कर्नल** : ठीक आहे, तसं करून बघू...

**प्रदीप** : आणखी एक गोष्ट विचारायची आहे.

**कर्नल** : लीलाबाईसंबंधी ?

**प्रदीप** : बरोबर. किती वर्षे आहेत त्या इथं ?

**कर्नल** : गेली वीस वर्षे...

**प्रदीप** : त्यांचं तुमचं काही नातं ?

**कर्नल** : नाही.

**प्रदीप** : बाई कशा आहेत स्वभावानं ?

**कर्नल** : तशा प्रामाणिक आहेत... शिवाय...

**प्रदीप** : वागणुकीनं नाही विचारलं... स्वभावानं ?

**कर्नल** : तशा कडक आहेत.

**प्रदीप** : बस्स, इतकंच...!

**कर्नल** : आणखी काय माहिती हवीय तुम्हांला ?

**प्रदीप** : या बाई नसल्या तर तुमचं अडेल ?

**कर्नल** : म्हणजे...

**प्रदीप** : विचारान्ती मला असं वाटतंय् की, त्यांना तुम्ही नोकरीतून मुक्त करावं.

कर्नल : ते शक्य नाही.

प्रदीप : का शक्य नाही ?

कर्नल : आजकाल अशी माणसं मिळत नाहीत.

प्रदीप : बस्स... एवढंच कारण ?

कर्नल : तरीही ते शक्य नाही...

प्रदीप : तुमच्या ' शक्य नाहीचा ' अर्थ मी नाही समजू शकत...

कर्नल : ते शक्य नाही इतकंच सांगू शकतो मी.

प्रदीप : चारू बरी व्हावी अशी इच्छा नाही तुमची ?

कर्नल : त्याचा लीलाबाईशी काय संबंध ?

प्रदीप : संबंध आहे म्हणूनच विचारतोय्. मला समजत नाही, तुम्हाला या गोष्टी समजतच नाहीत का तुम्ही न समजल्याचं सोंग करताय्? तुमच्या ' शक्य नाहीचा ' अर्थ काय ? जे काही चार दोन क्षण इथे घालवले, तुमची चारूशी वागणूक पाहिली की वाटतं की काही तरी कमी आहे. तुम्ही तिला जगातली सुंदर गोष्ट समजता ते शरीरसुख तिला मिळावं अशी तुमची इच्छा आहे. पण प्रेम मिळावं, निदान तुमचं स्वतःचं म्हणून तुम्ही काय केलंत ? नुसते प्रश्न आहेत माझ्याकडे. उत्तरं आहेत तुमच्याकडे...

कर्नल : तुमचं म्हणणं खरं आहे... माझं तिच्यावर उत्कट प्रेम नाही.

प्रदीप : पण का ? तुमची एकुलती एक मुलगी ना ती...

कर्नल : ती माझी मुलगी नाही...

प्रदीप : काय ?

कर्नल : हो... मी तिचा खरा बाप नाही... ती माझी मुलगी नाही... ती माझी मुलगी नाही...

( पडदा पडतो. )

# अंक दुसरा

## दृश्य पहिले

[ पंधरा दिवसांचा कालावधी उलटून गेला आहे. वेळ सकाळची. प्रकाश येतो तो कर्नलसाहेबांच्या घराच्या दिवाणखान्याच्या दृश्यावर. रंगभूमीवर कुणीही नाही. बेल वाजते. थोड्या वेळाने लीलाबाई बाहेर येऊन दार उघडतात. दारात लोखंडे उभा. ]

**लोखंडे :** कर्नलसाहेब आहेत का घरात ?

**लीला :** आहेत.

**लोखंडे :** मला जरा त्यांना भेटायचं आहे. काम आहे थोडंसं.

**लीला :** तुम्ही नोकरीकरता इथं आला होतात ना– ?

**लोखंडे :** बरोबर ओळखलंत तुम्ही, लताबाई.

**लीला :** लताबाई नाही...लीलाबाई.

**लोखंडे :** अरे हो, लताबाई, माझा मित्र नेहमी म्हणतो,– नाही, लीलाबाई. एखाद्याला नाव विचारायच्या ऐवजी दुसऱ्या नावानं हाक मारावी. तो लगेच आपलं खरं नाव सांगतो... न विचारता. आपल्याला नाव समजतं. डायरेक्ट नाव विचारलेलं कधी कधी कुणाला आवडत नाही म्हणून...

**लीला :** तुमचं काय काम आहे ?

**लोखंडे :** साहेबांशी... हो, साहेबांशी.

**लीला :** ते कामात आहेत. त्यांना वेळ नाही.

**लोखंडे :** त्यांनी सांगितलं तसं की मी जातो. माझा मित्र म्हणतो, ' साहेब कामात आहेत ' असं प्यून नेहमीच सांगतो. प्यून म्हणजे पी ई ओ एन् मधला प्यून. म्हणजे तुम्ही प्यून नाही. पण काय समजलं... ?

**लीला :** बसा तिथं...येतील ते इतक्यात.

**लोखंडे :** थँक्स...( बसतो. लीलाबाई जातात. थोड्या वेळाने कर्नल प्रवेश करतात. लोखंडे उठून उभा राहतो. ) गुड मॉर्निंग सर ! मी व्ही. व्ही. लोखंडे.

**कर्नल :** ओळखलं मी तुम्हाला. बसा. पण ' वा. वा. ' चा ' व्ही. व्ही. ' केव्हा झालं ?

**लोखंडे :** पर्सनॅलिटी सुधारतोय् मी. नावापासूनच. ' व्ही. व्ही. ' कशी एज्युकेटेड माणसाची इनिशियल वाटतात. माझा मित्र म्हणतो, तुझ्या इनिशियल-मध्ये जरी ' वा. वा. ' असलं तरी त्याचा अर्थ उगाचच ' अरे अरे ' वाटतो.

**कर्नल :** तुमचं काही काम आहे माझ्याकडे ? बसाना.

**लोखंडे :** होय साहेब. गुड न्यूज फॉर यू. मला नोकरी मिळतेय्. म्हणजे मिळाल्यासारखीच आहे. मला फक्त आपल्याकडून एक कॅरेक्टर सर्टिफिकेट पाहिजे.

**कर्नल :** माझ्याच कडून ?

**लोखंडे :** हो, म्हणजे अर्जाला वजन येईल. सर, आम्हा सामान्य माणसांच्या ओळखी पण सामान्य. कॅरेक्टर सर्टिफिकेट कसं स्टेटवाल्या माणसाकडून हवं. आमच्या चाळीत मोठ्यात मोठा स्टेटवाला माणूस म्हणजे पोंक्षे. म्हणजे तो म्युनिसिपालिटीत हेडक्लार्क आहे. आता त्याचं सर्टिफिकेट म्युनिसिपालिटी पण ॲक्सेप्ट करणार नाही. आता तुम्ही सांगा...

**कर्नल :** पण मी तुम्हाला फारसा ओळखत नाही.

**लोखंडे :** म्हणून तर सर्टिफिकेट द्यायचं. तुमची माझी चांगली ओळख असती तर मला तुमचं सर्टिफिकेट लागलंच नसतं. खरं की नाही ? ' टु द बेस्ट ऑफ माय नॉलेज ' लिहिलं की झालं.

**कर्नल :** हुषार आहात.

**लोखंडे :** उपयोग नाही. दोन गोष्टी आड येतात. गरज आणि इंग्रजी.

**कर्नल :** मग आता नोकरी कशी मिळाली ?

**लोखंडे :** दैवाच्या जोरावर. इंटरव्ह्यू घेणारा मॅनेजर शिवाजी युनिव्हर्सिटीचा पदवीधर, मग काय ! आमचं इंग्रजी त्याचं इंग्रजी...छान समजलं एकमेकांना... मग द्याल ना सर्टिफिकेट ?

**कर्नल :** देईन... ओ. के. ! उद्या येऊन घेऊन जा.

**लोखंडे :** थँक्स साहेब. मला ही नोकरी मिळाली ना की म्हातारा-म्हातारीला खूप आनंद होईल. खूप कष्ट घेतलेत हो त्यांनी माझ्यासाठी. आणि पहिला पगार झाला की तुम्हाला पेढे आणून देईन.

**कर्नल :** सर्टिफिकेट दिलं म्हणून ?

**लोखंडे :** साहेब, हे असे हिशेब आम्हाला नाही समजत. मनातच येत नाहीत. मी दिलेले पेढे कदाचित वजनानं दोनशे ग्रॅम असतील, पण भावनेनं तोलायला गेलात तर तुम्हाला तराजूच मिळणार नाही ! मग येऊ मी आता... ? उद्या येतो.

**कर्नल :** ओ. के. ! बाय बाय... !

[ लोखंडे जात असतानाच आतून लीलाबाई बाहेर येतात. ]

**लीला :** चारूताई ... चलता ना... ?

**कर्नल :** कुठं निघालात ... ?

**लीला :** तिला पुस्तक बदलायचं आहे. मला थोडीशी खरेदी करायची आहे. दोघी बरोबरच जाऊ आणि बरोबरच येऊ... तो गेला का... ?

**कर्नल :** गेला ! का... ? आणि लीलाबाई, चारू एकटी गेली तर काही बिघडणार नाही.

**लीला :** तसंच मी बरोबर गेले तरी काही बिघडणार नाही; आणि मुद्दाम नाही जात आहे. केवळ वेळ एक आली म्हणून.

[ उघड्या दारातून प्रदीप येतो. ]

**प्रदीप :** गुड मॉर्निंग... !

**कर्नल :** गुड मॉर्निंग !... या... या. [ चारू बाहेर येते. ]

**चारू :** चला लीलाबाई. ( प्रदीपकडे लक्ष जाते. ) अय्या ! तुम्ही... !

**प्रदीप :** बाहेर चाललीस ?

**चारू :** थांबू का—? महत्त्वाचं काम नाहीये, पुस्तक बदलायचंय्.

**प्रदीप :** लीलाबाई पुस्तक सिलेक्ट करतात की काय तुझ्याकरता ?

**लीला :** करत नसले तरी करू शकते. अशिक्षित नाही मी.

**चारू :** उगाच वाकड्यात का शिरता लीलाताई ?

**लीला :** प्रश्न वाकडाच होता. उत्तर सरळ कसं देऊ ?

**प्रदीप :** तुमचं म्हणणं बरोबर आहे. प्रश्न निश्चित वाकडा होता. उत्तर वाकडं आलं म्हणून मुळीच राग नाही. पण केव्हा तरी सरळ प्रश्न विचारीन, तेव्हा मात्र उत्तर सरळ द्या.

**लीला :** ( चारूला ) तू येतेस की मी एकटी जाऊ ?

**प्रदीप :** अं ऽ हं...तू एकटी जातेस की मी थांबू, असं विचारा.

**लीला :** अर्थ तोच.

**प्रदीप :** होत नाही...

**कर्नल :** तुमचा आज वादाचा मूड आहे ?

**प्रदीप :** ओ. के. ओ. के...जा तू चारू. त्यांच्याबरोबर जा...

**चारू :** मी लवकर येते.

**प्रदीप :** सावकाश ये...मी डॅडींबरोबरचं काम आटपतो.

[ दोघी जातात. ]

**प्रदीप :** तुम्हीही तिला अडवलंत नाही, तुम्हांला माहीत आहे. पूर्वीच सांगितलंय् मी त्यांचा सहवास चारूला उपकारक नाही.

**कर्नल :** पण थोडा वेळ गेली त्यांच्याबरोबर तर काय बिघडणार आहे ?

**प्रदीप :** बिघडतंय् म्हणूनच सांगतो. तुम्ही का नाही विश्वास ठेवत माझ्यावर ?

**कर्नल :** विश्वास नसता तर तुम्हांला या घरात घेतलं नसतं.

**प्रदीप :** मी आलोही नसतो; पण माझी ही विनंती तुम्ही मान्य का करीत नाही, हे मला अजून समजत नाही. तुमची अशी कल्पना आहे का चारूला लीलाबाई अतिशय आवडतात ?

**कर्नल :** तसा माझा मुळीच गैरसमज नाही. मला माहीत आहे तिला त्या मुळीच आवडत नाहीत.

**प्रदीप :** आणि तरीही तुम्ही माझं म्हणणं मानत नाही.

**कर्नल :** इतक्या वर्षांची माणसं एकदम बदलायची ?

**प्रदीप :** बदलायलाच हवीत. तुमचा हा थंडपणा पाहून मला वाईट वाटतं. पण मग लक्षात येतं की, हा थंडपणा अपरिहार्य आहे. तुम्ही चारूचा, तिच्या मनाचा विचार कळकळीनं करूच शकणार नाही... कारण... कारण...

**कर्नल :** 'ती तुमची मुलगी नाही.' वाक्य पूर्ण करताना अडखळता का ?

**प्रदीप :** मी पायरी सोडून किती बोलावं यालाही मर्यादा आहेत म्हणून. पण पायरी सोडून बोलायचं नाही असं ठरवलं तर मी तिच्याकरता काहीच करू शकणार नाही, हेही तितकंच खरं आहे. आणि तरीही तुम्हाला मी हे काहीच विचारलं नाही की मनापासून प्रेम देता येत नव्हतं तर अनाथ मुलीला घरी का आणलंत ?

**कर्नल :** कुणी सांगितलं ती अनाथ होती... आणि मी तिला घरी आणलं ?

**प्रदीप :** म्हणजे ?

**कर्नल :** ती अनाथ नव्हती. तिला आई होती. ती इथंच जन्मली. या घरात माझ्या पत्नीच्या पोटी...

**प्रदीप :** तुमची पत्नी... तिची आई.

**कर्नल :** पण मी तिचा बाप नाही.

**प्रदीप :** म्हणजे... तुम्ही चारूच्या आईशी लग्न केलंत तेव्हा ती... माफ करा, विचारायला विचित्र वाटतंय्... पण तेव्हा घटस्फोटित होती ? परित्यक्ता होती ? का विधवा होती ? का वाट चुकलेली कुमारिका होती ?

**कर्नल :** ती एक निष्पाप कुमारिका होती !

**प्रदीप :** आणि मग...?

**कर्नल :** दॅटस् ऑल ! तुम्हाला माझ्या साऱ्या खाजगी गोष्टी सविस्तर समजल्याच पाहिजेत का ?

**प्रदीप :** खरं आहे ! मला तसा कुठलाच अधिकार नाही... तुम्हाला मी हा प्रश्न विचारलाही नसता; पण सत्य सांगायला सुरुवात करून तुम्ही मधेच थांबलात. सत्याची पार्श्वभूमी समजली नाही की माणसाच्या वागणुकीचा संदर्भ लागत नाही... आणि मग गैरसमज होतात.

**कर्नल :** तुमच्या गैरसमजाची मला फिकीर नाही.

**प्रदीप :** दॅट इज युवर प्रिव्हिलेज !

**कर्नल :** वॉट डू यू मीन ?

**प्रदीप :** तुम्हाला गैरसमज आवडतात, मला आवडत नाहीत. स्वतः गैरसमज करून घेणं अगर दुसऱ्याला आपल्याविषयी गैरसमज करून घेण्याची संधी देणं दोन्हीही.

**कर्नल :** माझी सिक्रेटस् मी आतापर्यंत कुणालाच सांगितली नाहीत.

**प्रदीप :** तुमच्या सिक्रेटस्मधे मला तसा मुळीच इंटरेस्ट नाही. त्या सिक्रेट्सचा संबंध चारूशी कुठं तरी आहे... आणि मला तिला बरं करायचंय् म्हणून विचारतो हे असं कसं झालं...

**कर्नल :** इफ दॅट इज युअर इंटेंशन... ओ. के. ... मी लष्करात होतो. लग्न होऊन थोडेसे दिवस झाले होते; असाममध्ये पोस्टिंग मिळालं म्हणून त्या जंगलात

बायकोला घेऊन गेलो नाही. तिला इथंच ठेवली. महिनेच्या महिने जात होते. तिथून परस्पर फ्रंटवर जावं लागलं. लढाई थांबली. इतक्या दिवसांच्या वर्ष-भराच्या विरहानंतर आपली बायको भेटणार म्हणून उत्साहानं घरी आलो ॲन्ड आय वॉज शॉक्ड्. शी वॉज प्रेग्नंट. मस्तक फिरलं... तिचे दोन्ही दंड पकडून तिला गदगदून विचारलं... का केलंस हे असं?... का? कोण तो हरामखोर? मला नाव सांग त्याचं. मला फक्त नाव सांग... आणि तिनं नाव सांगितलं...

**प्रदीप :** गोळी घालून ठार मारायला हवं होतं तुम्ही त्याला...

**कर्नल :** हाच विचार माझ्याही मनात आला. तसाच तिरमिरीनं उठलो. लोडेड पिस्तुल खिशात टाकलं. आणि दाराच्या बाहेर पाऊल टाकणार, इतक्यात अडखळलो. तसाच बसून राहिलो रात्रभर विचार करीत. आणि विचार बदलला. मी काहीच केलं नाही. मी काहीच केलं नाही.

**प्रदीप :** हे सांगताना तुम्हांला काहीच वाटत नाही. तुम्ही घाबरलात. लष्करी युनिफॉर्मच्या आतलं तुमचं काळीज सशाचं होतं. तुम्ही भेकडपणानं वागलात. का नाही गोळी घालून ठार मारलात त्याला?

**कर्नल :** म्हणजे काय झालं असतं? तो ठार झाला असता. मी फासावर गेलो असतो. माझी बायको रस्त्यावर आली असती. एक जन्माला येणारा जीव शून्य भवितव्य घेऊन जन्माला आला असता. चार आयुष्यांची राख झाली असती. आणि व्यभिचार मात्र पुसला न जाता प्रसिद्धीच्या प्रकाशात तेजानं तळपला असता. एका स्त्रीचे मोहाचे काही क्षण आणि त्याची किंमत इतकी मोठी द्यायची? इतरांनी? याला न्याय म्हणायचा? नो... नो... धिस इज नॉट जस्टिस. न्याय देण्यासाठी मी कायदा हातात घेतला नाही...आय लेफ्ट इट टु द डेस्टिनी...

**प्रदीप :** आणि दैवानं न्याय दिला?

**कर्नल :** होय, दिला... त्या दिवसापासून मी माझ्या पत्नीला स्पर्शसुद्धा केला नाही. तसं कधी वाटलंच नाही. तिनं चारूला जन्म दिला आणि ती दीड-दोन वर्षांच्या आत झुरून झुरून झिजून झिजून मेली. त्या दिवसापर्यंत या मुलीलासुद्धा मी स्पर्श केला नव्हता. पण त्या दिवशी ती इतकी रडली की मी विरघळलो. वाटलं की, या चिमण्या जिवाचा काय दोष? तिला छातीशी घट्ट

धरली. आणि इच्छा नसताना या पोरीनं मला माया लावली. समजलं तुम्हाला सारं... ?

**प्रदीप :** चारूला माहीत आहे हे सारं... ?

**कर्नल :** काहीही नाही. तुम्ही समजता तसा मी निर्दय नाही. माझं वागणं चुकत असेल कधी, कदाचित रक्ताचं नातं नसेल म्हणून मी असा नकळत वागत असेन. पण उद्या नाही. तशा थोऱ्याशा भावनाही बोथट झाल्या आहेत. कारण माहीत आहे. माझ्या बायकोशी व्यभिचार करणारा दुसरा तिसरा कुणी नव्हता. तर माझा एक जिवाभावाचा मित्र...

**प्रदीप :** तुमचा मित्र ?

**कर्नल :** हो, माझा मित्र. त्या दिवसापासून मला कुणीही मित्र नाही. नातेवाईक नाहीत. कुणालाही जवळ केलं नाही मी. विश्वास तरी कुणाचा धरायचा ! का ? आणि कसा ? का माझ्या बायकोनं असं वागावं ? का माझा मित्र असा निघाला ? खूप विचार केला आणि उत्तर एकच मिळालं. माणसाला पापाची हौस नसते. शरीराची भूक माणसाला व्यभिचार करायला लावते. माणसाला हक्काचं शरीर मिळालं नाही की तो पापाकडे धावतो. शेवटी सगळ्यात खरी शरीराची भूक ती तृप्त झाली नाही की हे सारं सुचतं... आता आलं लक्षात, मी ती तुम्हाला विचित्र वाटणारी अपेक्षा का सांगितली...

**प्रदीप :** अं, हे असं आहे... एकूण तुमच्या मित्राचं पुढं काय झालं ?

**कर्नल :** त्यानं आत्महत्या केली. माझी बायको गेल्यानंतर लगेच.

**प्रदीप :** का ?

**कर्नल :** मला माहीत नाही. कदाचित तिच्यावरच्या प्रेमामुळं असेल.

**प्रदीप :** सारं मोकळेपणानं सांगितलंत याबद्दल आभारी आहे. माझे काही गैरसमज दूर झाले. त्यामुळं तसा मी परका आहे तुम्हाला. पण एक वचन देतो, हे सारं मी माझ्याजवळच ठेवीन.

**कर्नल :** वचन द्यायची आवश्यकता असती तर मी तुम्हाला सांगितलंच नसतं. माझी ऑफर धुडकावून लावणारा माणूस वेगळा आहे, हे जाणू शकतो मी. शिवाय तुमची चारूच्या सुखाकरता चाललेली धडपड मी डोळ्यांनी पाहतोय्.

**प्रदीप** : आणि मला थोडं थोडं यशही मिळतंय्. स्वतःभोवती विणलेल्या भीतीच्या कोशातून ती हळूहळू बाहेर येतेय. एक दिवस ती नक्की बरी होईल.

**कर्नल** : माझं फार मोठं सुदैव की तुम्ही मला भेटला. पण मोठ्यातलं मोठं दुर्दैव, तुम्ही फार उशीरा भेटलात.

**प्रदीप** : उशीरा म्हणजे ?

**कर्नल** : माय बॉय्...तू कुठं तरी आधीच गुंतला आहेस.

**प्रदीप** : प्लीज, भलती अपेक्षा तुम्ही ठेवू नका. ती अपेक्षा तुमच्या मनात कुठं तरी असेल तर ती लगेच काढून टाका. आय ॲम सॉरी. पण ती अपेक्षा असेल तर या क्षणी मला जबाबदारीतून मुक्त करा...

**कर्नल** : ओ. के. आय विल नेव्हर से इट अगेन.

**प्रदीप** : मनात पण आणू नका.

**कर्नल** : ओ. के. !

**प्रदीप** : खरं म्हणजे आज मी उभा आहे, तिच्यामुळे. सुमित्रामुळे. आणि तुमचा जॉब स्वीकारला ते तिनं भरीस पाडल्यामुळे. नाही तर मी केव्हाच नाही म्हणून ठरवलं होतं.

**कर्नल** : आय मस्ट थॅक्स हर.

**प्रदीप** : नक्कीच. एनी वे, तुमचं काही काम डिस्पोज ऑफ करायचं आहे ?

**कर्नल** : नाही, आज काही विशेष नाही.

**प्रदीप** : आणखी एक विनंती आहे चारूसंबंधी. तिच्याशी अधिक आपुलकीनं वागा. तिला गरज आहे त्याची. तुमच्या मनात तिच्याविषयी द्वेष नाही, किल्मिष नाही हे धरून चालतो मी.

**कर्नल** : खरं माझ्या मनात तसं काही नाही.

**प्रदीप** : मग तुमचं काम अधिक सोपं आहे. एक गोष्ट सांगितली तर तुम्हाला राग नाही ना येणार ?

**कर्नल** : सांगा...

**प्रदीप** : पूर्वी एकदा सांगितलेलंच आहे. पुन्हा एकदा सांगतो. कॅज्युअली नाही. निश्चितपणानं या घरात चारूवर जास्तीत जास्त दडपण कुणाचं असेल तर लीलाबाईचं. चारूला संपूर्ण बरं वाटायला हवं असेल तर त्यांना नोकरीवरून दूर करायला हवं.

**कर्नल :** ही तुमची मागणी मंजूर करणं मला शक्य नाही.

**प्रदीप :** खरं कारण विचारू शकतो मी ?

**कर्नल :** कारण मी तुम्हाला पूर्वीच सांगितलं आहे.

**प्रदीप :** ते कारण खरं नाही याची खात्री आहे मला.

**कर्नल :** चारूची काळजी कोण घेणार ?

**प्रदीप :** त्याची गरज नाही. आणि त्या काळजी घेत नाहीत, दडपण आणतात सतत. त्या ओझ्याखाली ती घरात वावरते. डोळ्यांतून पाह्यलंय् मी.

**कर्नल :** चारूची आई गेल्यापासून गेली वीस वर्षं त्या या घरात वावरताहेत. चारूला लहानाचं मोठं त्यांनी केलंय. वीस वर्षांच्या नोकरीनंतर मी त्यांना जायला सांगू ? केवळ तुमच्या शब्दाखातर... ?

**प्रदीप :** सारी कारणं खोटी आहेत तुमची. तुम्ही मला पटणारं एक कारण सांगा, मी त्याचा हट्ट सोडून देईन. ते दडपण दूर केल्याशिवाय चारू कशी बरी होईल ?

**कर्नल :** खरं कारण ऐकायचंय् ?

**प्रदीप :** इतका वेळ का लपून ठेवत होतात ?

**कर्नल :** तुम्ही पहिल्यांदा सांगितलंत तेव्हाच मी त्यांना स्पष्ट शब्दात कल्पना दिली आणि नोकरी सोडून जायला सांगितलं.

**प्रदीप :** मग काय म्हणाल्या त्या...?

**कर्नल :** जरूर सोडून जाईन. पण जाण्याआधी चारूला संपूर्ण सांगून जाईन.

**प्रदीप :** म्हणजे...

**कर्नल :** चारूच्या जन्माची कहाणी संपूर्णपणे नावासकट माहीत आहे त्यांना. सांगा, लीलाबाई या घरातून जाऊ शकतात ?

( पडदा पडतो. अंधार. )

## दृश्य दुसरे

[ साधारणपणे महिन्याचा कालावधी उलटून गेलेला. वेळ संध्याकाळची. कर्नलसाहेबांच्या घराच्या दिवाणखान्याचे दृश्य. प्रकाश येतो तेव्हा रंगभूमीवर कुणीही

नाही. थोड्याच वेळाने बाहेरून प्रदीप आणि चारू प्रवेश करतात. चारू सोफ्यावर बसते. ]

**प्रदीप** : दमलीस ?

**चारू** : थोडीशी. पण खूप बरं वाटतंय् मनाला.

**प्रदीप** : डॅडी गाडी घेऊन जायला सांगत होते, पण मीच नको म्हटलं.

**चारू** : चांगलं केलंत...

**प्रदीप** : का केलं सांगू ? गाडीत बसून मोकळी हवा नाही घेता येत. त्या हवेला श्रीमंतीचा, अहंकाराचा दर्प येतो. मोकळी हवा कशी मोकळ्या शरीरानं घ्यायला हवी.

**चारू** : खरच, आज मला खूप बरं वाटलं. नजरेत न मावणारं आकाश मी कधी पाहिलंच नव्हतं. मी कधी पाहिले हाते ते फक्त खिडकीतून दिसणारे आकाशाचे चौकोनी तुकडे. मला माहीत होते बादलीत, ट्यूबमध्ये भरून ठेवलेले मेलेले रंग, निसर्गानं केलेली जिवंत रंगांची मुक्त उधळण मी कधी पाहिलीच नव्हती. समुद्र आणि त्याच्या लाटा फक्त चित्रात पाहिल्या होत्या. क्षितिज हा शब्द पुस्तकात वाचला होता. पण आज मला निसर्ग पाहायला मिळाला. डोळे भरून मनात साठवून घेतला. ( एकदम ) तुम्ही आधी का नाही भेटलात मला ?

**प्रदीप** : योग नव्हता म्हणून.

**चारू** : उद्यापासून आपण रोज फिरायला जायचं हं...

**प्रदीप** : रोज कसं जमेल ... ?

**चारू** : का नाही जमणार ?

**प्रदीप** : मला काही इतर कामं नाहीत ?

**चारू** : ( ओशाळत ) विसरलेच मी...

**प्रदीप** : लगेच चेहरा पडला ? हे बघ चारू, जगात माणसानं दुसऱ्यावर फारसं अवलंबून असू नये. मी तुला निसर्गाची ओळख करून दिली. तू त्याच्या प्रेमात पडली असशील तर त्याला भेटायला एकटीनं जा. बघ निसर्ग कसा तुझ्याशी प्रेमानं गुजगोष्टी करील.

**चारू** : मी एकटीनं... ? ... एकटी ?

**प्रदीप** : काय बिघडलं ?

**चारू :** आणि मला काही झालं तर ?

**प्रदीप :** काय होणाराय ? गेल्या महिनाभरात काही झालं तुला ?

**चारू :** पण म्हणून...

**प्रदीप :** पुढंही होणार नाही. मनातली भीती काढून टाक तू. तुला काहीही झालेलं नाही. तू एक अत्यंत बुद्धिमान आणि रसिक मुलगी आहेस. कलावंत आहेस. तू फक्त एकच लक्षात ठेवायचंस, पुन: पुन्हा मनाला शिकवायचं ... मला काहीही झालेलं नाही ... मला कशाचीही भीती वाटत नाही.

**चारू :** सतत हाच प्रयत्न करत असते मी. झगडत असते स्वत:शी. पण संध्याकाळच्या कातरवेळी एकटी असले की सारं ओसाड वाटायला लागतं. एक भयानक पोकळी निर्माण होते. एक प्रचंड आवर्त निर्माण होतं. त्यात मी गरगरायला लागते आणि मग भीतीची एक प्रचंड लाट आणि मग त्यामागून अशा अनेक लाटांवर लाटा येतात. मला गुदमरून टाकतात आणि मी...

**प्रदीप :** डोन्ट वरी ! ... ही स्टेज पण लवकरच जाईल. तुला मी एक उपाय सांगतो. असं आवर्त झालं की घाबरायचं नाही. त्याला म्हणायचं, ये. हसायचं आणि मनाशी आपल्या अत्यंत आवडत्या व्यक्तीची आठवण करायची— तिचा हात धरायचा आणि विश्वासानं हसत उभं राहायचं ... वावटळ निघून जाईल ... पाचोळासुद्धा उरणार नाही.

**चारू :** बस्स ... ?

**प्रदीप :** बस्स ! बघ किती सोपं आहे ते.

**चारू :** मी प्रयत्न करीन. ( डोळे मिटून ) मी मनातल्या मनात तुमची आठवण करीन ... फक्त तु म ची ... आ ठ व ण करीन ...

**प्रदीप :** ( चमकून ) चारू ...

**चारू :** ( डोळे उघडते. ) चालेल ना ? ... ( तो स्वस्थ ) नाही चालणार...?

**प्रदीप** . ( सावरत ) हो...चालेल ना ? न चालायला काय झालंय ?... पण...चारू...

**चारू :** काय झालं ?

**प्रदीप :** काही नाही...खरंच काही नाही......

[ उघड्या दारातून कर्नल व लोखंडे प्रवेश करतात. ]

**कर्नल :** हॅलो प्रदीप... ! या लोखंडे... आत या ना... प्रदीप, तुमची

ओळख करून देतो. हे मिस्टर लोखंडे, हे प्रदीप देशपांडे आणि ही चारू माझी मुलगी...

**लोखंडे** : तसं यांना मी नावानं ओळखतो.

**प्रदीप** : मीसुद्धा.

**लोखंडे** : ( चारूला ) आणि तुम्ही ?

**चारू** : डॅडी बोलतात मधून मधून तुमच्याविषयी.

**लोखंडे** : चागलं का वाईट ?

**प्रदीप** : असं का विचारता तुम्ही ?

**लोखंडे** : मला नेहमीच ही शंका येते.

**प्रदीप** : इन्फीरिऑरिटी कॉम्प्लेक्स हा. काढून टाका.

**लोखंडे** : तो कसा ?

**कर्नल** : सुपीरिऑरिटी कॉम्प्लेक्स वाढवा.

**लोखंडे** : सध्या तो आपोआप वाढलाय्. या नवीन नोकरीत मीच सगळ्यात सुपीरिअर वाटतो. म्हणजे कल्पना करा बाकीचे कसे असतील. या नोकरीत एक समजलं. आपण आपले शत्रू असतो.

**चारू** : म्हणजे ?

**लोखंडे** : आपण ज्या गोष्टींना घाबरतो त्या लक्ष द्यायच्या लायकीच्या नसतात. भीतीमुळे उगाचच कॉन्फिडन्स जातो. आणि कॉन्फिडन्स नसलेला माणूस म्हणजे पेंढा भरलेला माणूस.

**प्रदीप** : यू सेड इट.

**लोखंडे** : आणि हे कुठेही वाचलेलं नाही किंवा मित्रानं सांगितलेलं नाही. हे अनुभवलेलं.

**चारू** : मग मघाशी चांगलं का वाईट, हा प्रश्न का विचारलात ?

**लोखंडे** : तुमच्याकडून ' चांगलं ' हे उत्तर मिळण्याकरता ?

**चारू** : सॉरी, मी तुमची निराशा केली.

**कर्नल** : लोखंडे, मी तुमच्याविषयी कधीही वाईट बोललो नाही.

**लोखंडे** : ती खात्री आहे माझी.

**कर्नल** : पण आता बोलणाराय्.

**लोखंडे** : का, काय झालं ?

**कर्नल :** अहो, कबूल केलेले पेढे कुठायत. नोकरी मिळाल्यानंतरचे द्यायचे कबूल केलेले ?

**लोखंडे :** त्याच्याचकरता आलो होतो.

**कर्नल :** आणि पेढे विसरलात.

**लोखंडे :** विकत घेतले होते. वाटेत एका लहान पोराची,— भीक मागत होतं ते, इतकी दया आली की पुडा त्याला देऊन टाकला. म्हटलं, तुम्ही पेढे खाऊन तुमचा डायबिटिस वाढण्याऐवजी त्याची भूक भागू दे. पुन्हा केव्हा तरी तुमच्याकरता आणीन.

**कर्नल :** आम्हाला पेढे मिळाले.

**लोखंडे :** आता मी चलतो. पुढच्या वेळेला.

**कर्नल :** कामाशिवाय या.

**लोखंडे :** जरूर. ( सगळ्यांना नमस्कार करीत. ) येतो... हो... [ जातो. ]

**प्रदीप :** छान माणूस आहे.

**चारू :** भोळा आहे, नाही ?

**कर्नल :** आहे खरा. काय बेटा...हाऊ आर यू... ?

**चारू :** फाइन ! डॅडी, आज खूप लांब फिरायला गेलो होतो, समुद्रावर. रेशमी वाळूचा स्पर्श आज पहिल्यांदा अनुभवला. सूर्य समुद्रात बुडताना कसा उदास होतो, शुक्राची चांदणी उगवताना कशी हसते, लाटा किनाऱ्यावर फुलं कशी उधळतात, झाडं कशी गाणी म्हणतात—— खूप— खूप पाहायला मिळालं; ऐकायला मिळालं...

**कर्नल :** काय बेटा ! एखाद्या... नवीन कादंबरीतली वर्णनं ऐकवतेस की काय मला ?

**चारू :** मलाही असंच वाटायचं डॅडी, की ही वर्णनं फक्त पुस्तकात असतात. पण मी आज हे स्वतः अनुभवलंय्. ह्यांच्यामुळं...

**प्रदीप :** मी काय केलंय् ?

**कर्नल :** खूप काही केलंय्. अशी मोकळेपणानं हसताना आणि बोलताना मी हिला पहिल्यांदा पाहतोय्.

**प्रदीप :** तुम्ही हे नेहमी पाहू शकला असतात.

**कर्नल :** तुम्ही आधी भेटला असतात तर !

**प्रदीप :** नाही... तुम्हाला आधी समजलं असतं तर...

**कर्नल :** काय समजलं असतं तर ?

**प्रदीप :** की तिला मोकळ्या हवेची, मोकळ्या वातावरणाची गरज आहे, नको ती गरज तुम्हाला मोलाची वाटली. आणि खरी गरज तुम्हाला दिसलीच नाही. भलत्याच गोष्टी तुम्ही धरून चाललात, त्याचे परिणाम तुम्ही कल्पनेत रंगवलेत आणि उपाय त्यावर केलेत.

**चारू :** कमाल आहे तुमची. आमच्या डॅडींना - रिटायर्ड कर्नलना— तुम्ही चार गोष्टी सुनावता आणि डॅडी, तुम्ही चक्क ऐकून घेता ? डॅडींना हे सांगायला भीती वाटत नाही... ?

**प्रदीप :** मला भीती वाटत नाही. म्हणून मी खरं सांगू शकतो.

**कर्नल :** यू आर नाउ ए डेज डॉमिनेटिंग मी.

**प्रदीप :** आय ॲम सॉरी, इफ यू फील दॅट वे.

**कर्नल :** काही हरकत नाही. मला राग नाही तुमचा. बाय द वे, थोडी लहान-सहान कामं डिस्पोज ऑफ करायची आहेत. आपण जरा वेळ माझ्या खोलीत बसू या का ?

**प्रदीप :** शुअर. ( चारूला— ) पाच मिनिटांत येतो.

[ दोघं आत जातात. चारू एकटीच खिडकीशी विचारात गढलेली. प्रकाश मंद होतो. लीलाबाई आतून येतात. दिवा लावतात. चारू दचकते. ]

**चारू :** लीलाबाई, तुम्ही...?

**लीला :** अंधारात एकट्याच बसल्या आहात ?

**चारू :** हो, का ?...

**लीला :** भीती नाही वाटत ?

**चारू :** कशाची ? अंधाराची ? आता बिलकुल नाही.

**लीला :** प्रकृती बरीच सुधारलेली दिसते आहे.

**चारू :** काही हरकत नाही ना तुमची ?

**लीला :** काय बोलता हे ! तुम्हाला बरं वाटतंय्. मला खूप आनंद झाला.

**चारू :** तुम्हाला आनंद होऊ शकतो, लीलाबाई...

**लीला :** का...? मी माणूस नाही ?

**चारू :** नाही... मी तुम्हाला हसताना कधी पाहिलंच नाही...

**लीला :** आनंद झाला म्हणजे हसलंच पाहिजे ?

**चारू :** मुद्दाम नाही... सहज यायला पाहिजे. आतून. पण तुम्ही– आनंद झाला तरी हसायचं नाही... असा नियमच जणू...

**लीला :** आज तुम्ही खूप बोलताय्...

**चारू :** कारण आता मला भीती वाटत नाही. भीतीमुळे शब्द आतल्या आत अडकायचे; पण आता मी कशालाच भीत नाही.

**लीला :** छान... ( स्तब्ध ) फिरायला गेला होतात ?

**चारू :** हो.

**लीला :** एकटीनं ?

**चारू :** नाही, प्रदीपबरोबर.

**लीला :** ऐकणार असाल तर एक सांगू ?

**चारू :** काय सांगायचय् तुम्हाला ?

**लीला :** तुमच्या चांगल्याकरता सांगणार आहे.

**चारू :** ते मी ठरवीन.

**लीला :** प्रदीप हा चांगला माणूस नाही.

**चारू :** त्यांच्या तोंडावर हे सांगू शकाल...?

**लीला :** नाही...

**चारू :** मग ते खोटं आहे.

**लीला :** अजून नोकरी करायची आहे मला. काही गोष्टी स्पष्ट नाही बोलता येत... पण तुला सांगू शकते मी. तो चांगला माणूस नाही.

**चारू :** काय वाईट आहे त्यांच्यात ? माझ्यासाठी किती त्रास घेतात. मला बरी करायला धडपडतायत्. बोलतात तरी किती गोड. सतत ऐकत रहावं असं... सांगा त्यांच्यात वाईट काय आहे ?

**लीला :** गोड बोलणारी माणसंच फार धोकादायक असतात.

**चारू :** कसला धोका ? ( धीर हळूहळू सुटतोय. )

**लीला :** स्त्रीला पुरुषापासून कसला धोका असतो ?

**चारू :** नाही...नाही...तुम्ही खोटं सांगताय्...ते तसे नाहीत.

**लीला :** कुणीच तसं वाटत नाही. पण सगळी तशीच असतात. पुरुष हा

शेवटी पशू असतो. आणि तो पशू जागा की झालं– त्याला दुसरं तिसरं काही दिसत नाही. फक्त वासना आणि स्त्रीच्या शरीराचा भोग. मग तो सगळं सगळं विसरतो. शरीरावर तुटून पडतो. त्याचे लचके तोडतो. ओरबाडून काढतो. मन रक्तबंबाळ होईपर्यंत. तृप्तीची, समाधानाची ढेकर देतो, आणि शांतपणे निघून जातो; जणू काही घडलंच नाही, आणि शेवटी उरतं ओरबाडलेलं शरीर आणि रक्तबंबाळ मन...

**चारू :** नाही, नाही हे खरं नाही...हे खरं नाही. उगाच वेडीविद्री चित्रं माझ्या डोळ्यासमोर उभी करू नका हो...

**लीला :** मी तुला खरं ते सांगितलंय्.

**चारू :** पण ते तसे नाहीत.

**लीला :** आणि असता तर ? धोका पत्करायची तयारी आहे तुझी ?

**चारू :** अं...

**लीला :** पुरुष सगळे तसेच असतात. तो प्रसंग आठव. दहा वर्षांपूर्वीचा... आठव तो प्रसंग...

**चारू :** नाही, नाही, मला तो प्रसंग आठवायचा नाही. ( पूर्ण बावरलेली; डोळ्यावरती हात ठेवते. ) मला तो प्रसंग आठवायचा नाही...

**लीला :** डोळ्यांवरती हात ठेवून तो प्रसंग नाही पुसला जायचा.

**चारू :** का मला त्याची आठवण करून देता ?

**लीला :** मी सांगितलेल्या गोष्टी तुला पटत नाहीत म्हणून.

**चारू :** मी पटवून घेईन. स्वतःला; पण मला भीती नका दाखवू. भीती मी विसरतेय्. तुम्हाला माझी दया नाही येत ?

**लीला :** ( तिच्या चेहऱ्यावरचे केविलवाणे भाव पाहतात. गलबलून जातात. चेहरा बदलतो. मृदू होतो. मूकपणानं तिच्या केसांवरून हात फिरवतात.)

**चारू :** सांगा ना...

**लीला :** तसं नाही ग पोरी...खरंच तसं नाही.

**चारू :** मी तुमचं काय वाईट केलंय् ?

**लीला :** तू काहीच केलं नाहीस माझं.

**चारू :** मग का माझ्याशी अशा वागता ?

**लीला :** खरंच, का वागते मी अशी ? का ?

**चारू :** तुम्हाला माझ्याविषयी काहीच वाटत नाही ?

**लीला :** तुझ्याविषयी मला काय वाटतं ते माझं मलाच कळलेलं नाही. मी फार वाईट वागते का ग तुझ्याशी... ?

**चारू :** कधी कधी मला भीती वाटते तुमची. खरं म्हणजे तुम्ही माझ्या आईच्या जागी...

**लीला :** ( चेहरा बदलतो. ) बस्स ! मी तुझ्या आईच्या जागी नाही...

**चारू :** तुमची मला पुन्हा भीती वाटायला लागली.

**लीला :** तू भीती कधीच विसरू शकणार नाहीस.

**चारू :** नाही. मी विसरणार आहे.

**लीला :** तू विसरणार नाहीस. तू विसरणार आहेस प्रदीपला.

**चारू :** का तुम्ही माझं सुख हिरावून घेताय ?

**लीला :** तुझ्या सुखाकरताच मी करतेय हे सारं... आजपासून त्याचा सहवास बंद ! त्याच्याशी बोलायचं नाही. त्याच्याबरोबर फिरायला जायचं नाही. तुझ्या सौंदर्याचा, तुझ्या तारुण्याचा तो फायदा घेईल आणि शेवटी तुला रस्त्यावर फेकून देईल... तुला मी सांगेन तसंच वागलं पाहिजे. नाही तर...

**चारू :** ( घाबरलेली ) मी वागेन तसं...

**लीला :** नक्की ?

**चारू :** हो...

**लीला :** आजच सांगून टाक...

**चारू :** हो...

**लीला :** तू घाबरू नकोस... मी आहे तुझ्या पाठीशी... पण मी सांगितलल्या-प्रमाणं झालं तर... नाही तर... नाही तर... [ जातात.]

**चारू :** ( एकटीच ) का... का... तुम्ही हे सारं सांगितलंत... ? मला तुमची भीती वाटते, लीलाबाई... मला तुमची भीती वाटते... तुम्ही सांगता तसं मला वागायलाच हवं... वागायलाचं हवं...

( एकटीच टेबलावर डोके ठेवून बसते. प्रकाश मंद होतो. आतून कर्नल आणि प्रदीप बाहेर येतात. )

**कर्नल :** काय करतेस बेटा एकटीच ?

**चारू :** ( दचकून उठते. ) काही नाही... काही नाही... खरंच काही नाही...

**प्रदीप :** घाबरलीस तू चारू ? अग, बोल ना...
( जवळ जातो; तिला हलकेच स्पर्श करतो. )

**चारू :** अंगाला हात लावू नका माझ्या...

**प्रदीप :** अग ' मी ' आहे. एवढं घाबरायला काय झालं ? हे बघ, उद्या संध्याकाळी आपण फिरायला जायचं ना ?

**चारू :** मी तुमच्याबरोबर फिरायला येणार नाही.

**प्रदीप :** का ग, काय झालं... चारू, तू घाबरली आहेस... ( स्तब्ध ) इथं लीलाताई आल्या आता ?

**चारू :** तुम्हांला काय करायचंय् त्याच्याशी ?

**प्रदीप :** म्हणजे आल्या होत्या... ( पुन्हा जवळ जातो. )

**चारू :** स्पर्श करू नका मला...दूर व्हा...

**प्रदीप :** चारू...

**कर्नल :** बेटा, एवढं घाबरायला काय झालं ?

**चारू :** मला भीती वाटते डॅडी... मला भीती वाटते. डॅडी, तुम्ही मला घराच्या बाहेर नाही ना काढणार ?

**कर्नल :** काय खुळ्यासारखं बोलतेस !... घाबरू नको बेटा...

**चारू :** डॅडी...आज इतक्या वर्षांत पहिल्यांदा विचारलंत बेटा एवढं घाबरायला काय झालं ? आणि पाठीवरून हात फिरवून सांगितलंत, घाबरू नको बेटा...

**कर्नल :** मला सांग कसली भीती वाटते ?

**चारू :** नाही... मला नाही सांगता येत... पण मला भीती वाटते... मी आता जाते...

**प्रदीप :** चारू, तू आत जायचं नाहीस.

**चारू :** ( काकुळतीनं ) मला जाऊ द्या ना आत.

**प्रदीप :** तू आत जायचं नाहीस.

**चारू :** डॅडी, सांगा ना यांना...

**कर्नल :** लेट हर गेट इन्...प्लीज...

**प्रदीप :** नो...

**कर्नल :** आणि ती व्हायोलंट झाली तर...

**प्रदीप :** होणार नाही. चारू, बैस इथं.

**चारू :** नका हो, मला जाऊ दे... मला भीती वाटतेय्... चारी बाजूंनी भीतीचे लोट माझ्या अंगावर येताहेत. मला गरगरल्यासारखं होतंय्.

**कर्नल :** चारू...

**प्रदीप :** तिला बोलू द्या... अडवू नका. आणखी काय होतंय्...

**चारू :** जिकडे तिकडे पोकळी...नुसती पोकळी...मी गरगरतेय्...ही पोकळी मला खाऊन टाकणार आहे. सारं जग म्हणजे पशू आहे...मला ओरबडताहेत. मला रक्तबंबाळ करताहेत...माझ्या चिंध्या करताहेत...मला वाचवा हो !... कुणी तरी मला वाचवा...! मला वाचवा...! मला वाचवा...! ( हळूहळू व्हायोलंट होतेय् ) दूर व्हा सारीजणं...( प्रदीप पुढे होतो.) पुढे नको येऊस... मी ठार मारीन तुला... पण सुटेन याच्यातून... ( आणखी पुढे होऊन तिचे दंड धरतो. )

**प्रदीप :** भानावर ये चारू ...

**चारू :** माझ्या अंगाला हात लावू नकोस ... सोड मला ... सोड...

**कर्नल :** चारू ऽ ऽ

**प्रदीप :** ओरडू नका तिच्या अंगावर...

**चारू :** सोड मला ... सोड मला ... सटवे ... ( बेभानपणे त्याच्यावर प्रहार करते.) सोड म्हणते ना मला ... सोड ... सोड मला ...

**प्रदीप :** मी तुला सोडणार नाही ...

**चारू :** मला सोडणार नाही ... का ... का ... नाही सोडणार ... सोड मला.

**प्रदीप :** तुला वाचवण्याकरता ... धरलंय् मी ...

**चारू :** तुम्ही वाचवणार मला...तुम्ही वाचवणार...तुम्ही ? लीलाबाई... कुठं आहेत ? ... ( भानावर येते.)

**प्रदीप :** त्या नाहीत इथं ... इथं मी आहे ... प्रदीप...

**चारू :** मला वाचवा... मला सोडून नका जाऊ...

( ओक्साबोक्शी रडत त्याच्या मिठीत विसावते.)

( पडदा पडतो. अंधार. )

## दृश्य तिसरे

[ वेळ सकाळची. प्रकाश येतो तो प्रदीपच्या रूमच्या दृश्यावर. प्रदीप आरामखुर्चीत वाचत बसला आहे. दारावर टक्टक् होते.]

**प्रदीप :** या ... दार उघडंच आहे. ( दार उघडून चारू प्रवेश करते.) तू...? अशी कशी अचानक आलीस ! ये ना ...

**चारू :** अशी अचानक न बोलावता आले म्हणून राग नाही ना आला ?

**प्रदीप :** अं ऽ हं... मला राग येतो तो बोलावून न येणाऱ्या माणसांचा ... न बोलावता येणाऱ्या माणसांचा नाही ...

**चारू :** पण मी कधी ...

**प्रदीप :** तुझ्याबद्दल नाही म्हटलं. तुला कधी मी बोलावलंच नाही इथं.

**चारू :** का ?

**प्रदीप :** या राजवाड्यात पाहण्यासारखं काय आहे ? एका बेशिस्त माणसाची कळाहीन खोली...

**चारू :** तुम्हाला बेशिस्त कोण म्हणेल ? काही तरीच.

**प्रदीप :** तुला सांगतो चारू. बाहेर शिस्तशीर असणारी माणसं घरी अशी माझ्यासारखी बेशिस्त असतात.

**चारू :** इथं किती मोकळं मोकळं वाटतंय्...

**प्रदीप :** फर्निचर नाही ना, म्हणून. अग, बस ना. आल्यापासून उभीच आहेस...ओ ! अरे हो, पण बसशील कुठे, अं...या इथं आरामखुर्चीत बैस... बसता येईल असा हा एकच पीस आहे इथं...

**चारू :** आणि तुम्ही ?

**प्रदीप :** मी उभा राहतो. कारण कुणी तरी एकानं उभं राहिलंच पाहिजे. आणि पाहुण्यांना उभं करून स्वतः बसणं म्हणजे बॅड मॅनर्स. त्यामुळं तुलाच बसायला हवं... तर आपण बसा. अग, बस ग. ( चारू बसते.) बोल, चहा घेणार का कॉफी... म्हणजे याच्या पलीकडचं सांगू नकोस... घरात फक्त चहा आणि कॉफीच आहे.

**चारू :** मला काही नको... खरंच काही नको...

**प्रदीप :** घाबरलीस ? अग, चहा काय फर्स्ट क्लास करतो मी. एकदा पिऊन

बघ. जन्मभर आठवण राहील या चहाची.

**चारू :** ( मोकळेपणानं हसते ) अहो, पण नको म्हटलं तर...

**प्रदीप :** अग, हो म्हण. जिवाचं काही बरं-वाईट होणार नाही मग. तरीही नको... ठीक आहे. नाही तरी कंटाळाच आला होता.

**चारू :** आज तुम्ही भलतेच मूडमधे आहात.

**प्रदीप :** माझा मूड कधी जात नाही. आपले प्रॉब्लेम्स नाही सांभाळता येत तर मूड कुठं सांभाळत बसू...

**चारू :** खरं म्हणजे मी येऊ की नको याचा विचार करीत होते.

**प्रदीप :** का ?

**चारू :** मला वाटतं तुम्ही माझ्यावर रागावला असाल... दोन दिवसांत फिरकला नाहीत... माझ्यावर रागावला नाहीत ना ?

**प्रदीप :** कशाबद्दल... ?

**चारू :** मला नीटसं आठवत नाही... पण तुमच्याशी नीट नाही वागले मी त्या दिवशी...

**प्रदीप :** फरगेट इट... माझ्या मनात तसं काही नाही...

**चारू :** मग का नाही आलात दोन दिवसांत ?

**प्रदीप :** परवा माझी स्वतःची कामं होती... काल माझ्या मैत्रिणीचा वाढदिवस होता, म्हणून नाही येऊ शकलो.

**चारू :** मग कळवलं का नाहीत तसं ?

**प्रदीप :** फोन करायचा प्रयत्न केला. पण लागला नाही...

**चारू :** खरं म्हणजे डॅडीच आज चौकशीला येणार होते. पण मी म्हणाले मी स्वतः जाते.

**प्रदीप :** आणि डॅडी ' हो ' म्हणाले ?

**चारू :** हो, गाडी दिली, ड्रायव्हरनं इथं आणलं मला.

**प्रदीप :** आणि लीलाबाई...? ( चारू स्तब्ध ) लीलाबाईंची परवानगी घेतलीस ? सांग नं...?

**चारू :** त्यांच्या न कळत आले...

**प्रदीप :** आणि त्यांना कळलं तर ?

**चारू :** त्यांना आवडायचं नाही.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय ठाणे.
दा. क्र 92325 नों. दि 30.4.1...

प्रदीप : बस्स ! इतकंच ?

चारू : आणि त्या मला...

प्रदीप : काय करतील...

चारू : काही नाही...

प्रदीप : काही नाही... मारतील ? झोडतील ? काय, करतील काय ? का घाबरतेस तू त्यांना इतकी ?

चारू : मी...मी कुठे घाबरते त्यांना...?

प्रदीप : इकडं बघ...माझ्या नजरेला नजर भिडवून सांग की तू त्यांना घाबरत नाहीस...

चारू : मी...हो, मी घाबरते त्यांना...

प्रदीप : पण का ?...

चारू : ए उगीचच...

प्रदीप : उगीचच ? शक्य नाही. तू खोटं बोलतेस माझ्याशी.

चारू : खरंच तसं काही नाही...

प्रदीप : चारू, मला खरं उत्तर हवंय्. माझ्यावर विश्वास ठेव चारू.

चारू : नाही, मी तुम्हाला कधीच सांगणार नाही. कधीच सांगणार नाही.

प्रदीप : मर्जी तुझी ! मी तुला पुन्हा कधी विचारणार नाही. पण एक लक्षात ठेव. चारू, मी तुला पुन्हा कधीच भेटणार नाही. जिथं विश्वास नसतो तिथं मी पाऊल टाकत नाही.

चारू : तसं नाही हो. कसं सांगू मी तुम्हाला ?

प्रदीप : निर्भयपणानं मला खरं ते सांग.

चारू : ते फार भयंकर आहे.

प्रदीप : ते मी ठरवीन.

चारू : तुम्ही माझा तिरस्कार कराल. मला दूर लोटाल.

प्रदीप : काहीही असलं तरी मी तुझा तिरस्कार करणार नाही.

चारू : खरंच...

प्रदीप : अगदी खरं... विश्वास ठेव माझ्यावर. मला माहीत आहे तू त्यांना अतिशय घाबरतेस. का... का तू त्यांना इतकी घाबरतेस ? खरं म्हणजे त्या तुला तुझ्या आईच्या जागी.

**चारू** : माझ्या आईशी तुलना करू नका त्यांची; माझी आई अशी नव्हती.

**प्रदीप** : तुला आठवते तुझी आई ?

**चारू** : नाही...माझी आई गेली तेव्हा मी फक्त दोन वर्षांची होते. पण माझी आई अशी असणं शक्यच नाही.

**प्रदीप** : आणि तेव्हापासून तुला लीलाबाईंनी वाढवलं.

**चारू** : हो, वाढवलं, पण कसं ? मायेनं ममतेनं नाही— तर त्यांनी मला वाढवलं त्यांच्या मनाप्रमाणे, त्यांच्या इच्छेप्रमाणे !

**प्रदीप** : तुला काय हवं, काय नको ते कधी बघितलंय् त्यांनी ?

**चारू** : हं...त्यांनी नेमकं उलटं केलं ! मला हव्या असलेल्या गोष्टी नाकारायच्या, हिरावून घ्यायच्या. नको असलेल्या गोष्टी सक्तीनं लादायच्या. माझ्या हिताच्या नावाखाली मी वाढले ती मायेच्या पंखाखाली नाही तर निवडुंगाच्या कुंपणात...! सतत लीलाबाईंच्या धाकाखाली.

**प्रदीप** : पण डॅडींना कधी...

**चारू** : त्यांना माझ्याकडे लक्ष द्यायला कधी वेळच झाला नाही. त्यांचं पोस्टिंग सतत बदलायचं...महिनोन् महिने त्यांचं तोंडसुद्धा दिसत नसे.

**प्रदीप** : आणि तू एकटी रहायचीस लीलाबाईबरोबर ? चारू, लीलाबाईंनी तुला मायेने वाढवलं नसेल, पण एक गोष्ट नक्की, त्यांनी तुझ्या अंगावर हात कधी टाकला नसेल...

**चारू** : कोण म्हणतं असं ? त्यांनी तेव्हा तेही केलंय्— तेही केलंय्.

**प्रदीप** : म्हणजे चारू...

**चारू** : हो, त्यांनी मला मार मार मारलंय्.

**प्रदीप** : पण का ?

**चारू** : अशाच एका संध्याकाळी......तेव्हा मी तेरा-चौदा वर्षांची होते. शाळेत जात होते...एके दिवशी संध्याकाळी मला घरी यायला उशीर झाला. शाळेत प्रोग्रॅम्स होते. ते संपायला उशीर झाला. मला एकटीनं यायची भीती वाटली. म्हणून सोबत एका मैत्रिणीच्या भावाला बरोबर घेतला. तो घरापर्यंत आला. आणि काळोखात त्यानं मला करकचून मिठी मारली. माझ्या शरीराशी झट्ट लागला. मला कुस्करून टाकली. भीतीनं माझी वाचाच गेली, आणि इतक्यात लीलाबाईंनी दार उघडलं. तो मुलगा पळून गेला आणि मग लीलाबाईंनी

मला मार मार मारलं. माझ्यावर आरोप केला, मीच त्याला बोलावून घेतलं, खुशीनं. मी असले धंदे करते. मी परोपरीनं सांगत होते. त्यानं माझ्यावर बळजबरी केली. तर म्हणाल्या किंचाळली का नाहीस ? तू खोटं बोलते आहेस. त्यांनी मला धमकी दिली. डॅडींना सांगितलं तर घरातून बाहेर काढतील. रस्त्यावर येशील. तुला कुणीही जवळ करणार नाही. आणि अखेर शरीर-विक्रय करणारी वेश्या होशील. मी त्यांच्या पाया पडले. नका ना सांगू डॅडींना. म्हणाल्या, नाही सांगणार, पण यापुढे मी सांगेन तसंच वागलं पाहिजे तुला. त्या क्षणापासून मी त्यांची गुलाम झाले. मी त्यांच्या शब्दाबाहेर जाऊच शकत नाही. सतत मला धमकी देत असतात. आठवण करून देत असतात आणि मी घाबरते. आणि... आणि... तुम्हीही आता माझा तिरस्कार कराल. करा... सगळ्यांनी माझा तिरस्कार करा... मला खेळवा... मला नाचवा...

(भावनावेग असह्य होऊन हमसाहमशी रडू लागते.)

**प्रदीप :** हे बघ चारू, माझ्याकडे बघ. मला तुझा मुळीच तिरस्कार वाटत नाही. पण हे आधी का नाही सांगितलंस सारं ?

**चारू :** कुणाला सांगायचं ?

**प्रदीप :** डॅडींना, का नाही विश्वासात घेतलंस ?

**चारू :** त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला नसता.

**प्रदीप :** मी डॅडींना सांगितलं तर ?

**चारू :** नाही नाही, तुम्ही सांगू नका...

**प्रदीप :** हे बघ तुझी काही चूक नाहीये. तू निष्कलंक आहेस. मनातलं सारं काढून टाक. लपवलंस तर मात्र ती चूक होईल. तुला धीर होत नसेल तर डॅडींना मी सांगतो.

**चारू :** त्यानं काय मिळणार आहे ?

**प्रदीप :** तुझी भीती जाईल.

**चारू :** आणि त्यांनी मला घराबाहेर काढलं तर ?

**प्रदीप :** मी असताना तू रस्त्यावर यायची नाहीस. पण मला एक समजत नाही, लीलाबाईंनी तुझ्याशी असं का वागावं ? या प्रश्नाचं उत्तर कधीच मिळणार नाही. हरकत नाही. एक गोष्ट नक्की, लीलाबाई तुमच्याकडे आता क्षणभरही राहू शकणार नाहीत.

**चारू :** खरंच तुम्ही डॅडींना सांगून त्यांना घालवू शकाल? डॅडी ऐकतील तुमचं? परवानगी देतील?

**प्रदीप :** ( लक्षात येऊन ) ओ!...डॅडी परवानगी नाही देऊ शकणार...

**चारू :** काय म्हणालात तुम्ही...डॅडी ऐकणार नाहीत तुमचं?

**प्रदीप :** ही इज हेल्पलेस...

**चारू :** म्हणजे लीलाबाई आमच्याकड राहणार, शेवटपर्यंत?

**प्रदीप :** ( अगतिक ) लीलाबाईंना डॅडी जा म्हणून सांगू शकणार नाहीत.

**चारू :** पण का?...

**प्रदीप :** कारण?... कारण नाही सांगता यायचं मला...

**चारू :** तुम्ही लपवताय् माझ्यापासून?

**प्रदीप :** हो, लपवतोय्. कारण मलाच माहीत नाही. हे बघ चारू, यापुढे तुला लीलाबाईचा त्रास होणार नाही. ती काळजी कशी घ्यायची, डॅडींशी काय बोलायचं, मी विचार करीन... तू काही काळजी करू नकोस...

**चारू :** पण...

**प्रदीप :** माझ्यावर विश्वास नाही तुझा?

**चारू :** तुमच्याशिवाय कुणावरच विश्वास नाही माझा. माझं सारं आयुष्य बदलून टाकलंय् तुम्ही. मला वाटलं होतं या वर्तुळातून मी कधीच बाहेर पडू शकणार नाही. पण आता मला आत्मविश्वास आहे. मी एक नॉर्मल मुलगी आहे. मला काही झालेलं नाही. कारण काही होणार नाही. तुमच्या आधारानं मी कुठलंहो संकट पार पाडू शकेन...

**प्रदीप :** चारू...

**चारू :** अरे हो, विसरलेच मी. तुमच्याकरता एक गंमत आणलीय्. गाडीतच राहिली. मी आत्ता येते हं. ( वळते. दार उघडते. दारात सुमित्रा उभी. ) कोण हवंय् आपल्याला?

**प्रदीप :** चारू... अग, येऊ दे तिला आत. [ सुमित्रा आत येते. ]

**चारू :** मी अडवलं नव्हतं... सहज विचारलं...

**प्रदीप :** चारू, ही सुमित्रा... आणि सुमित्रा, ही चारू... म्हणजे मी जिथं प्रायव्हेट सेक्रेटरी आहे त्या कर्नलसाहेबांची ही मुलगी.

**सुमित्रा :** असं होय?

चारू : तुमच्याविषयी ऐकलं होतं, पण आज तुम्हाला पाहिलं.

सुमित्रा : मी तुमच्याविषयी खूप ऐकलं होतं...

चारू : काय ऐकलं होतं ?

सुमित्रा : तुम्ही दिसायला खूप सुंदर आहात. भाबड्या आहात, वगैरे वगैरे...

चारू : तुम्ही मला 'तुम्ही' नाही म्हटलंत तर नाही का चालायचं ?

सुमित्रा : अं ऽ हं... तू मला तू म्हटलंस तर नाही का चालायचं.

चारू : तुम्ही म्हणाल की ही मुलगी आगाऊ आहे, पण 'तुम्ही' म्हणजे कसं परकं परकं वाटतं. आणि मला जे माणूस आवडतं ना त्याच्याशी मी जवळीक साधायचा प्रयत्न करते. अर्थात असे प्रसंग फार आलेच नाहीत; कुणी येऊ दिले नाहीत. तुम्हाला सांगितलं तर आश्चर्य वाटेल, मला एकही मैत्रीण नाही.

सुमित्रा : मग मित्र आहेत ?

चारू : ( हसते ) मित्र... मला ? मैत्रीण नाही तर मित्र कुठून असणार ? तुम्ही भाग्यवान आहात.

सुमित्रा : का ?

चारू : तुम्हाला यांच्यासारखा मित्र आहे. आणि त्यांना तुमच्यासारखी मैत्रीण आहे

प्रदीप : मला वाटतं इथं मी पण आहे. हे तुम्ही दोघीही विसरलेल्या दिसताय्. त्यापेक्षा मी जरा बाहेर जातो.

चारू : काही नको... आम्ही नाही बोलत...

सुमित्रा : अरे, बोलू दे तिला...

प्रदीप : अरे, मी कुठं नाही म्हटलं ? पण मला अगदीच फर्निचरचा पीस नका समजू. एवढंच मला म्हणायचंय्.

चारू : तुम्ही या ना एकदा आमच्याकडे. तुम्ही घेऊन या ना यांना.

सुमित्रा : हो, तू काढलेली सुंदर स्केचेस पाहायला.

प्रदीप : आता पटलं ना... माझं कौतुक फक्त तोंडावर नसतं...

चारू : पुरे... मी निघू आता... ? डॅडी वाट पहातील...

प्रदीप : अरे, पण काही तरी गंमत आणलीयस ना तू ?

चारू : गाडीत आहे, आणून देते.

**प्रदीप** : मी येऊ का खाली ?

**सुमित्रा** : थांब... मी आणते ती गंमत... चल...

**चारू** : येते हं...

(दोघेही जातात. क्षणभरानं सुमित्रा एकटीच प्रवेश करते. विचारात गढलेली. हातात स्केच...)

**प्रदीप** : काय गंमत आहे, पाहू तरी... (तिच्या हातातून घेतो.) ओ ! स्केच...ब्यूटिफुल...सुमित्रा, हे स्केच म्हणजे तिच्या मनाचं प्रतिबिंब आहे. या चित्रात एकाकीपणाची छटा नाही. आनंद म्हणजे काय ते तिला समजलंय्. तुला नाही आवडलं हे चित्र ?...

**सुमित्रा** : सुंदर आहे.

**प्रदीप** : एखाद्या टीकाकारासारखी गंभीरपणानं सांगते आहेस.

**सुमित्रा** : नाही रे.

**प्रदीप** : पुन्हा गप्प राहिलीस ? तुला बरं नाहीये का ? का मूड नाहीये ?

**सुमित्रा** : मला काहीही झालेलं नाही. खरंच काही नाही.

**प्रदीप** : मग बोलत का नाहीस ? चारू आवडली नाही तुला ?

**सुमित्रा** : खूप आवडली. ती इतकी चांगली आहे की...

**प्रदीप** : काय ?

**सुमित्रा** : मला वाटतं तुला भरीला घातलं ही फार मोठी चूक तर नाही ना केली ?

**प्रदीप** : जेलसी दाय नेम इज वुमन... !

**सुमित्रा** : तुला माहीत आहे तशी मी नाही.

**प्रदीप** : मग हे बोलतेस त्याला काय म्हणायचं ? कौतुक ?

**सुमित्रा** : मला खरंच वाटलं मी चूक केली. ही मुलगी इतकी सुंदर आहे, इतकी भाबडी आहे, याची मला आधी कल्पना असती ना तर मी नक्कीच तुला आग्रह केला नसता. उद्या जर तू...

**प्रदीप** : तसं काही नाहीये ..

**सुमित्रा** : ते कसं शक्य आहे ?

**प्रदीप** : तुला माझा संशय येतो. सुमित्रा, माझ्या मनात...

**सुमित्रा** : मला सांगू नकोस, स्वतःलाच विचार. आणि उत्तर काही आलं

तरी मी तुला दोष देणार नाही. कारण दोष असलाच तर माझा आहे. आणि मला तिचा रागही येत नाही.

**प्रदीप :** सुमित्रा, तुझी इच्छा असेल तर या क्षणी मी नोकरी सोडून देतो.

**सुमित्रा :** त्याचा काही उपयोग नाही. आता खूप उशीर झालाय्.

**प्रदीप :** तू हे डोक्यात काय घेतलंस हेच मला समजत नाही.

**सुमित्रा :** मलाही काही समजेनासं झालंय्...

**प्रदीप :** तू शांत हो. थंडपणानं विचार कर. असं काही नाहीये. हे बघ, उद्या आपण भेटू ना...

**सुमित्रा :** तुला यापुढं भेटायचं की नाही, मला विचार करावा लागेल.

**प्रदीप :** पण का ?

**सुमित्रा :** उमलणाऱ्या कळीचं फुलणं नाही रोखता येत. जाताना ती काय म्हणाली माहीत आहे ? अगदी भाबडेपणानं...मला ते इतके आवडतात... की माझं...मी त्यांच्या आधाराशिवाय जगूच शकणार नाही...त्यांच्याशिवाय मी जगूच शकणार नाही...[ वेगाने जाते. ]

**प्रदीप :** नाही, सुमित्रा नाही...तसं होणं शक्य नाही. सुमित्रा...सुमित्रा... ( हताश ) सुमित्रा...तुला माहीत नाही मी धडपडतोय्, झगडतोय् एकटाच... स्वतःशीच. ती निरागस वेडी पोर माझ्यावर प्रेम करतेय्, मला माहीत आहे. तिच्या निरागसपणानं मला वेड लागलंय्. होय, सुमित्रा... तिचा मोह मला झालाय्. तिच्या आकर्षणात माझ्या मनाच्या चिंध्या होताहेत. सुमित्रा, हे सारं नकळत घडतंय् माझ्या इच्छेविरुद्ध. तुला दुखवायचं नाहीये मला. तुला फसवायचं नाहीये. पण तिचे घाबरलेले डोळे शोधत शोधत माझ्या नजरेला येऊन भिडतात तेव्हा त्या क्षणापुरतं मी तुला विसरतो... आयुष्यात माणसं भेटतात ती आधीच गुतलेली का असतात ? आणि गुंतलेली असतात तर भेटतातच का ? आयुष्याचा गुंता करण्याकरता ? का त्याला अनर्थाचा अर्थ देण्याकरिता ! पण मी आणखी गुंतणार नाही. सर्वांनाच दुःखी करण्यापेक्षा कुणाला तरी आयुष्यातून कायमचं दूर केलं पाहिजे. प्रश्न फक्त एकच ! प्रश्न फक्त एकच आणि तोही जीवघेणा ! कुणाला ... ? कुणाला ? कुणाला ?

( पडदा पडतो. )

# अंक तिसरा

## दृश्य पहिले

[ पडदा उघडतो. प्रकाश येतो कर्नलसाहेबाच्या दिवाणखान्यावर. दिवाणखान्यात कुणीही नाही. बेल वाजते. चारू आतून येते. दार उघडते. लोखंडे प्रवेश करतो.]

**चारू :** या...

**लोखंडे :** कर्नलसाहेब नाहीत घरात ?

**चारू :** आहेत की, बसा ना आपण. येतील ते इतक्यात. बाहेर जायच्या तयारीत आहेत. बसा ना...

**लोखंडे :** ( बसत ) थँक्यू...

**चारू :** बऱ्याच दिवसांनी आलात.

**लोखंडे :** नाही, तुम्ही बऱ्याच दिवसांनी भेटलात ! तसा मी मधे एकदा-दोनदा येऊन गेलो, पण तुमची–माझी वेळ जमली नाही. मला वाटतं आपण प्रथम भेटलो ते मी पहिल्या नोकरीचे पेढे आणले तेव्हा आणि शेवटचे भेटलो ते दुसऱ्या नोकरीकरता चिठ्ठी मागायला आलो तेव्हा.

**चारू :** आज कसं येणं केलंत ?

**लोखंडे :** पण आज ठरवलं जायचंच म्हणून. तसं माझं फार मोठं आणि फार वेळ घेणारं काम नाहीये.

( लोखंडेच्या एकूण बोलण्या-चालण्यात आणि वागण्यात आत्मविश्वास.)

**चारू :** तुम्ही खूप बदलल्यासारखे वाटताहात ?

**लोखंडे :** असं ? शक्य आहे ! बदलायची संधी मिळाली म्हणून कदाचित बदललो असेन...पण...बदललो म्हणजे एक्झॅक्टली काय झालंय्...?

**चारू :** तसं मला नीटसं सांगता नाही यायचं...पण...

**लोखंडे :** मी सांगतो; पूर्वीसारखा मी बावळट नाही. करेक्ट ? ( ती गप्प ) तुम्ही गप्प बसलात म्हणजे निश्चित करेक्ट...हो ना...?

**चारू :** खरं सांगायचं तर 'हो'.

**लोखंडे :** खरंच सांगायचं. खोटं कशाला सांगायचं? तुमच्या मनात आता पुढचा प्रश्न असेल. 'असं कसं झालं ?'

**चारू :** वा ! तुम्ही अगदी मानसशास्त्रसुद्धा शिकलात वाटतं ?

**लोखंडे :** नाही... तर्कशास्त्र... तर तुमच्या पुढच्या प्रश्नाचं उत्तर माणूस जसा दिसतो ना तसा तो असतोच असं नाही आणि असतो तसा दिसतोच असं नाही. दुर्दैव दारिद्य आणि अपयश. या तीन गोष्टी माणसाला लाचार बनवतात. परिणामी बावळट आणि सुदैव, पैसा आणि यश याची कृपा झाली की माणूस आपोआप तरतरीत दिसायला लागतो. गरज माणसाला किती क्षुद्र बनवते. तुम्हांला माहीत नाही, गरजवंताला घरची दारची कुठचीच माणसं किंमत देत नाहीत. गरज आणि गरजवंत या विषयावर मी एक प्रबंध लिहू शकेन, असं नाही तुम्हांला वाटत ! जाऊ दे नाही ! फारशी ओळख नसताना मी तुमच्याशी फार बोलतोय्.

**चारू :** फारशी ओळख नसताना म्हणजे ? मी ओळखते तुम्हाला...

**लोखंडे :** कितीशी... ?

**चारू :** तशी थोडीशी, पण आता आणखी ओळख पटतेय्.

**लोखंडे :** तेव्हा तुम्ही मला पुरेसं ओळखत नव्हता. तेच चांगलं होतं.

**चारू :** का ?

**लोखंडे :** तुमचं माझ्याविषयी अतिशय वाईट मत झालं असतं.

**चारू :** कशावरून ?

**लोखंडे :** आता मी कसा होतो, हे तुम्हाला माहीत का मला ?

**चारू :** पण वाईट मत झालं असतं तर काय बिघडलं असतं ?

**लोखंडे :** काहीच बिघडलं नसतं ?

**चारू :** माझं मत तुम्हाला इतकं महत्त्वाचं वाटतं का ?

**लोखंडे :** का... ? याचं उत्तर तुम्हीच शोधून काढा.

[ चारू गोंधळलेली... इतक्यात आतून डॅडी प्रवेश करतात. ]

**कर्नल :** कसलं उत्तर शोधून काढताय् लोखंडे ?

**लोखंडे :** ( हसत ) प्रश्नाचं.

**कर्नल :** कसला प्रश्न ?

**लोखंडे :** उत्तर माहीत नसलेला.

**कर्नल :** ( चक्रावून ) तुम्ही लोखंडे ना ?

**लोखंडे :** हो, का ?

**कर्नल :** तुम्ही गरगरून टाकलेत मला... बोला... आज कुठं इकडे...?

**लोखंडे :** एक न्यूज द्यायला आलोय्. आधीची नोकरी सोडली. तुमच्याकडे जिच्या संदर्भात आलो होतो ती नोकरी मिळाली.

**कर्नल :** इज इट ? यू आर अ लकी बाय्...! प्रत्येकाचे दिवस असतात लोखंडे. ही हजार रुपयांची नोकरी तुम्हाला मिळेल असं स्वप्नात तरी तुम्हाला वाटलं होतं का ? एनी वे, तुम्हाला दिलेल्या चिठ्ठीचा उपयोग झाला तर...

**लोखंडे :** नाही सर...

**कर्नल :** म्हणजे ?

**लोखंडे :** त्या चिठ्ठीचा मी उपयोग केलाच नाही. माझा इंटरव्ह्यू फर्स्ट क्लास झाला. मी त्यांना इंप्रेस करू शकलो आणि मला नोकरी मिळाली. कृपया गैरसमज नका करून घेऊ.

**कर्नल :** नॉट ॲट ऑल. पण असं का केलंत तुम्ही ?

**लोखंडे :** गरज नव्हती आणि आत्मविश्वास होता. त्या स्वतःवरच्या विश्वासाची परीक्षा घेतली. आणि बस्स...ठरवलं. बघू या एक चान्स घेऊन...

**कर्नल :** आणि नसती मिळाली ही नोकरी तर ... ?

**लोखंडे :** हा उलटा विचार मी केलाच नाही ... म्हटलं मिळाली तर स्वतःच्या कर्तृत्वानं मिळाली याचं समाधान किती मोठं असेल, असा विचार केला.

**कर्नल :** तुमच्यातला हा चेंज मला फार आवडला.

**लोखंडे :** थँक्यू...

**कर्नल :** पण तुम्ही नुसतीच बातमी सांगायला आलात ... येताना निदान पेढे तरी आणायचेत ...

**लोखंडे :** नेहमी नेहमी पेढे कसले द्यायचे...?

**कर्नल :** मग बर्फी चालेल...

**लोखंडे :** तीही नाही आणली...

**कर्नल :** कमाल आहे ! इतकी कंजुषी चांगली नाही...

**लोखंडे :** कंजुषी नाही केली... काही तरी आणलंय्...

**कर्नल :** काय आणलंय् ?

**लोखंडे :** तुमच्याकरता नाही... चेंज म्हणून यांच्याकरता आणलंय.

**चारू :** माझ्याकरता...?

**कर्नल :** छान आहे ! चिठी मी दिली. तुम्ही ती वापरली नसेल पण मी दिली. आणि आणलंय् हिच्याकरता...

**लोखंडे :** आणि तेसुद्धा असं की तुम्हाला त्याचा काही उपयोग नाही... ( पुस्तक काढतो. चारूच्या हातात देत—) तुम्हाला आवडेल... ' आर्ट ॲन्ड मूड्स्.' तुम्ही चित्रं काढता ना ?— म्हणून तुमच्या... हेच पेढे समजा...

**चारू :** किती सुरेख ! थँक्यू व्हेरी मच...! डॅडी, बघा ना...

**कर्नल :** छान आहे. वजनदार. विकलं तर शंभर ग्रॅम पेढे यायला हरकत नाही.

**चारू :** डॅडी ?...

**कर्नल :** इटस् अ जोक बेटा... चल मी निघतो आता.

**लोखंडे :** मी पण निघतोय्.

**कर्नल :** चला, मग बरोबरच निघू...

**लोखंडे :** निघतो मी. ओळख झालीय् आज आपली ती...

**चारू :** आज झालेली तुमची ओळख मी विसरणार नाही...

**लोखंडे :** थँक्यू...

[ कर्नल आणि लोखंडे जातात. ]

( चारू पुस्तकाकडे पाहते. एकटीच विचारात. )

[ आतून लीलाबाई येतात. ]

**लीला :** चारू...

**चारू :** आलात तुम्ही ? या...

**लीला :** काय आहे हातात ?

**चारू :** तुमच्या उपयोगाचं नाहीये...

**लीला :** पुस्तक ?

**चारू :** अर्थात्...

**लीला :** प्रेझेंट मिळालं ?

**चारू :** का ?

**लीला :** कुणी दिलं ?

**चारू :** तुम्हाला काय करायचंय् त्याच्याशी ?

**लीला :** हे त्याचं उत्तर नव्हे.

**चारू :** नेहमीप्रमाणे चोरून ऐकत असाल तुम्ही सारं. तुम्हाला सारं माहीत आहे. मग का मला विचारता ?

**लीला :** त्या इसमानं...

**चारू :** कोण इसम ?

**लीला :** त्याला इसम म्हटलं म्हणून तुला राग आला का ? त्यानं तुला प्रेझेंट द्यायचं कारण काय ?

**चारू :** त्यानं मला प्रेझेंट का देऊ नये ?

**लीला :** तुला समजत कसं नाही ? त्याला तुझ्याविषयी काही तरी वाटत असणार म्हणून त्यानं तुला प्रेझेंट दिलं...

**चारू :** ओह ! हा मुद्दा माझ्या लक्षातच नाही आला. थँक्यू लीलाबाई... तुम्ही लक्षात आणून दिलंत...

**लीला :** तेच म्हणते मी. त्याच्यापासून सावध रहा. सुरुवात अशीच प्रेझेंट-पासून होते आणि शेवट...

**चारू :** शेवट काय होतो...?

**लीला :** ही पुरुषजात सगळी निमकहराम असते. त्याला आणखी पुढे येऊ देऊ नको. माझं ऐक. यापुढे तो या घरात पुन्हा येता कामा नये. तुझ्या डॅडींना सांग तसं. डॅडी बंदोबस्त करतील. तरी मला मघाशीच संशय आला होता. तुझ्या भल्याकरता सांगतेय्...

**चारू :** सांगून संपलं ? मग आता माझं ऐका. तुम्ही सांगता त्यातलं अक्षरही मी करणार नाही.

**लीला :** चारू...

**चारू :** उगाच ओरडू नका लीलाबाई...

**लीला :** माझ्या नजरेला नजर देऊन देऊन हे सांगू शकतेस तू ?

**चारू :** ( वळते; नजर भिडवते. ) शंभर वेळा.

**लीला :** याचे परिणाम...

**चारू :** काय होतील ते मला माहीत आहेत. पुढे बोला...

**लीला :** तुला जड जातील ते. तुझं काय पुढं होईल माहीत आहे तुला ?

**चारू :** हो माहीत आहे.

**लीला :** तरीही इतक्या मस्तीत सांगतेस ?

**चारू :** हो... ! हो... ! हो... !

**लीला :** चारू...

**चारू :** तुम्ही कितीही ओरडलात तरी मी घाबरणार नाही. लीलाबाई, तुमच्या नजरेला नजर भिडवून हजार वेळा मी तुम्हांला सांगू शकेन. तुम्हांला पाहिजे ते तुम्ही करू शकता. मी त्याला भीक घालत नाही. तुम्ही माझं काहीच वाकडं करू शकणार नाही. लीलाबाई, तुमच्या धमक्या मी ठोकरून लावते. तुम्हांला डॅडींना जे सांगायचंय् ते तुम्ही खुशाल सांगा. मी माझ्या भवितव्याशी एकटीनं सामना देईन. कुणाचाही आधार न घेता. इतके दिवस तुमचा जाच सहन केला. त्या दडपणाखाली गुदमरून गेले. पण आता मी पूर्ण निर्भय झालेय्. माझं आव्हान आहे तुम्हांला, जी धमकी तुम्ही मला आयुष्यभर देत आलात ती पुरी करून दाखवा. मी तुम्हांला घाबरत नाही लीलाबाई...मी तुम्हांला मुळीच घाबरत नाही...

( लीलाबाई अवाक. )

( पडदा पडतो. अंधार. )

## दृश्य दुसरे

[ दृश्य तेच. वेळ सकाळची. रंगभूमीवर कुणी नाही. बेल वाजते. लीलाबाई आतून येतात. दार उघडतात. दारात प्रदीप. ]

**लीला :** तुम्ही आज येणार नव्हता ना ?

**प्रदीप :** हो ! तुम्हांला कसं कळलं ?

**लीला :** तुम्ही येणार नाहीत म्हणून चारूताई फिरायला गेल्यायत.

**प्रदीप :** एकट्याच...?

**लीला :** साहेबांबरोबर...

**प्रदीप :** कधी त्यांच्याबरोबर फिरायला गेल्याचं ऐकलं नाही.

**लीला :** कधी जात नाहीत. आज गेलेयत.

**प्रदीप :** तुम्हांला बरोबर न घेता ?

**लीला :** तुम्हांला खूप आनंद झाला असेल.

**प्रदीप :** आणि तुम्हांला ?

**लीला :** तुम्ही माझ्याशी सरळ का बोलत नाही ?

**प्रदीप :** आज बोलणाराय्. लीलाताई, तुमची माफी मागायची आहे मला.

**लीला :** कशाबद्दल ?

**प्रदीप :** तुम्हाला माहीत आहे की नाही मला माहीत नाही, पण तुम्हाला काढून टाकण्याबद्दल कर्नलसाहेबांना मीच सांगितलं होतं. या वयात तुम्हाला त्रास द्यायची माझी इच्छा नव्हती.

**लीला :** मग गंमत म्हणून मला काढून टाकायला सांगितलंत ?

**प्रदीप :** इतरांच्या आयुष्याकडे 'गंमत' म्हणून निदान मी तरी पाहात नाही. गंमत म्हणून मी कुणाला आयुष्यातून उठवणार नाही.

**लीला :** तुमच्या बोलण्याचा रोख ?

**प्रदीप :** रोख असा काही नाही. अर्थ इतकाच, चारूच्या सुखाकरता मी तसा सल्ला दिला.

**लीला :** म्हणजे चारूच्या स्थितीला जबाबदार मी ?

**प्रदीप :** माझं तसं प्रामाणिक मत आहे.

**लीला :** म्हणजे ते चुकीचं नाही असं नाही.

**प्रदीप :** असेल नाही तर नसेल.

**लीला :** साहेब शहाणे म्हणून त्यांनी तुमचा सल्ला ऐकला नाही.

**प्रदीप :** शहाणे का असाहाय्य... !

**लीला :** असाहाय्य का म्हणून ?

**प्रदीप :** परिणामांना घाबरल्यामुळं... गरज नसताना.

**लीला :** तुमची माहिती अपूर्ण आहे म्हणून अशी विधानं करताय्.

**प्रदीप :** त्याची जाणीव आहे मला. चारूचा जन्म कसा झाला ? तुम्ही इथं

केव्हा आणि कशा आलात ? चारूला तुम्ही कसं वाढवलं ? ही सारी माहिती मला असली तरी ती अपुरीच आहे.

**लीला :** तुम्हाला हे सारं माहीत आहे ?

**प्रदीप :** थोडं फार !

**लीला :** तरी पण एक गोष्ट तुम्हाला निश्चित माहीत नाही...

**प्रदीप :** ...आठ वर्षांपूर्वीचा चारूवरचा प्रसंग... ज्याचं भांडवल करून तुम्ही तिला पेचात धरलीत. तिला आपलं गुलाम केलंय्. तेही सारं अक्षर न् अक्षर माहीत आहे मला.

**लीला :** ते सारं खोटं आहे !

**प्रदीप :** मग खरं काय आहे ?

**लीला :** मी तिला गुलाम केलं नाही !

**प्रदीप :** चारूला छळलं नाहीत ?

**लीला :** शिस्तीत वागवणं म्हणजे छळणं नाही.

**प्रदीप :** तसंच धाक आणि भीती म्हणजे शिस्त नाही. आणि का हे सारं ? छळायचंच होतं तर तिला वाढवलंत कशाला आणि वाढवायचं होतं तर छळलंत कशाला ?

**लीला :** बऱ्याच गोष्टी तुम्ही गृहीत धरताय्.

**प्रदीप :** कशावरून ?

**लीला :** मी तिला छळलंय् हेच खोटं आहे.

**प्रदीप :** कदाचित् तुमचं कारण सबळ असेल, संपूर्ण न्याय्य असेल...

**लीला :** ( अनवधानानं ) असेल... नाही निश्चित होतं.

**प्रदीप :** माझी खात्री होती तशी... आणि माझा दुसराही तर्क खरा असेल तर... त्या कारणाचा संबंध असावा चारूच्या जन्माशी...

**लीला :** तुम्हाला काय माहिती... ?

**प्रदीप :** मला काहीच माहिती नाही... माझा तर्क आहे. खरा आहे ना तो ?

**लीला :** याचं उत्तर मी देणार नाही...

**प्रदीप :** उत्तर मिळालं ! लीलाबाई, चारूच्या जन्माचं रहस्य तुम्हाला कसं माहिती ? कुणी सांगितलं ?

**लीला :** याचं उत्तर मी नाही दिलं तर ?

**प्रदीप :** तुमच्या चांगुलपणावरचा विश्वास उडेल माझा.

**लीला :** माझा चांगुलपणा तुमच्या तोंडून, हे शब्द अपेक्षित नव्हते.

**प्रदीप :** माणूस कुठे नेहमीच अपेक्षेप्रमाणे वागतो. बोलतो.

**लीला :** माझ्याकडून उत्तर काढून घेण्यासाठी तुम्ही चांगलं म्हणताय्.

**प्रदीप :** नाही. तुमच्यात थोडासा तरी चांगुलपणा असायला हवा. नाही तर तुम्ही तिला वाढवली नसती.

**लीला :** तरीही तुमच्या प्रश्नाची उत्तरं मी देणार नाही.

**प्रदीप :** माझा मुळीच आग्रह नाही. केवळ माणसाच्या मनाविषयी कुतूहल म्हणून उत्तरं हवी होती. पण लीलाबाई, तुमचा फार मोठा पराभव झाला आहे. तुमचा डाव मी उधळून लावलाय्. चारू यापुढे तुम्हाला कधीच घाबरणार नाही... जी धमकी देऊन तुम्ही तिला दडपणाखाली ठेवलंत त्या प्रसंगात विशेष काहीच नव्हतं. साहेबांना मी ते सारं स्वतःच सांगितलंय् आणि ती अजून घरातच आहे. त्यांनी तिला घराबाहेर काढलं नाही. तिच्या मनातली खोल रुतलेली भीती आता नष्ट झालीय्. तुमच्या शब्दांनाच काय तुमच्या अस्तित्वाला-सुद्धा ती यापुढे कधीच घाबरणार नाही. दुसरी गोष्ट तिच्या जन्माचं रहस्य तुम्ही तिला सांगू शकता. कर्नलसाहेबांची हरकत नाही.

**लीला :** म्हणजे ?

**प्रदीप :** तिचा त्याच्यावर विश्वास बसणार नाही. तुम्ही काही बोललात तरी तो तिला तुमचा डाव वाटावा अशी खबरदारी घेतलीय्. तुमचा संपूर्ण पराभव झालाय्. लोक एखादा चांगला संकल्प सोडून त्यासाठी आयुष्य वेचतात आणि तुम्ही एका अश्राप जीवाचा छळ करण्यासाठी आयुष्य खर्ची घातलंत. का ? कशासाठी ? आणि पदरात काय पडलं ?

**लीला :** अश्राप जीव...? एका पापाचं फळ...

**प्रदीप :** तुमचा काय संबंध त्याच्याशी ?

**लीला :** ते पाप माझ्या नवऱ्याचं होतं.

**प्रदीप :** लीलाबाई...

**लीला :** हो, माझ्या नवऱ्याचं पाप होतं ते. त्या देखण्या स्त्रीच्या आकर्षणात ते फसले. तिच्यावर प्रेम करायला लागले, मला घरी रडत ठेवून. मी काय पाप

केलं होतं की माझ्या वाट्याला हे यावं! आणि त्या पापातून जन्म झाला चारूचा. चारूची आई मेली आणि माझ्या नवऱ्यानं तिच्यापाठोपाठ आत्महत्या केली. माझं पुढं काय होईल हा विचारही त्याच्या मनात आला नाही. या जगात मी एकटी पडले आणि डोक्यात एक विचार आला. तशीच साहेबांकडे गेले. त्यांच्या पाया पडले. म्हणाले, माझ्याशी लग्न करा. या पोरीला मी सांभाळीन, तिला वाढवीन. मला त्यांच्याशी लग्न करायचं होतं केवळ सूड म्हणून. पण त्यांनी स्पष्ट नकार दिला. पाठ फिरवली. तुमची बदनामी जगजाहीर करीन अशी धमकी दिल्यावर त्यांनी मला नोकरीला ठेवली. मी नोकरीला राहिले ते पोटाकरता नाही. तर एका विकृत समाधानासाठी. हे पापाचं फळ माझ्या डोळ्यांसमोर सतत राहील. त्याचा छळ करीन. त्याचा रस शोषून घेईन. निःसत्त्व करीन; आणि मगच समाधानाचा श्वास सोडीन. हो, आहे मी दुष्ट. आहे मी विकृत. पण मी काय भोगलंय् ते तुम्हांला काय माहीत आहे? माझं समाधान हिरावून घेतलंत तुम्ही. माझा पराभव तुम्ही केलात... माझ्या मार्गाआड तुम्ही आलात, का...?

**प्रदीप :** अशा मार्गानं समाधान मिळत नाही, लीलाबाई.

**लीला :** मला मिळालं असतं.

**प्रदीप :** शक्य नाही. तुम्ही स्त्री आहात. कधी तरी असा क्षण आला असेल की वागताना तुमचं काळीज गलबललं असेल. असा क्षण कधीच आला नाही?

**लीला :** माझं काळीज मी फेकून दिलंय्.

**प्रदीप :** हे माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही; आणि तुम्ही उत्तर दिलं नाहीत तर ते उत्तरच समजतो मी. कुठं तरी आईचं वात्सल्य तुमच्या काळजात असणारच. तुम्ही तिला वाढवलंय्. दोन वर्षांची असल्यापासून. तुमच्या डोळ्यांतलं पाणी याचं उत्तर देतेय्. खूप बोलतंय् ते. लीलाबाई, चारू तुमची मुलगी आहे. तुमचीच मुलगी आहे ... तुमचीच मुलगी आहे ... तिचं पालन तुम्ही केलंय् ... अजून सूडाची भावना काढून टाका...

**लीला :** आणि ...

**प्रदीप :** आणि ... सांगायला जिवावर येतंय्. पण तुम्हाला हे घर सोडून जायला हवं...

**लीला :** मी तशी वागले नाही तरी ...

**प्रदीप :** हो. लीलाबाई, दुर्दैवानं तुम्ही कशाही वागलात, कितीही प्रेमानं

केलंत तरी चारूचा त्यावर कधीच विश्वास बसणार नाही. ती सतत तुमच्याकडे संशयानं पाहील. आणि त्याचं दुःख तुम्हाला जास्त होईल. वीस वर्षांची चूक एका दिवसात कुणालाच सुधारता यायची नाही. तुम्ही सोडून जावं हाच एक उत्तम मार्ग. तुम्हाला दुसरी नोकरी मिळायची व्यवस्था मी कर्नलसाहेबांना करायला सांगेन.

**लीला :** आणि आयुष्य काढायचं कुठल्या समाधानासाठी ?

**प्रदीप :** एक शिकायला नाही मिळालं ... सूड हे कुठल्या प्रश्नाचं उत्तर असूच शकत नाही. सूड नियती घेते, माणूस नाही. दुर्दैव एवढंच, हे शिकायला तुम्हाला आयुष्य खर्ची घालावं लागलं लीलाबाई ... तुम्ही जा इथून. माझं डोकं भणभणायला लागलंय्. एकच विनंती आहे. चांगुलपणा दाखवायची एक अखेरची संधी तुमच्यापाशी अजून आहे. तिचा विचार करा आणि निर्णय घ्या.

[ लीलाबाई आत जायला निघणार इतक्यात चारू आणि कर्नल प्रवेश करतात. ]

**चारू :** अय्या ! तुम्ही केव्हा आलात ?

**प्रदीप :** थोडाच वेळ झालाय्.

**चारू :** असा काय दिसतोय् तुमचा चेहरा ?

**प्रदीप :** कुठं काय ?

**चारू :** डॅडी, तुम्हाला दिसतात हे नेहमीसारखे ? खरं म्हणजे आम्ही लवकर परत आलो. डॅडींना थकल्यासारखं वाटायला लागलं.

**कर्नल :** तुम्ही कसल्या तरी विचारात आहात का ?

**प्रदीप :** हो ... मला तुमच्याशी थोडंसं बोलायचं आहे ... आजच.

**चारू :** तुम्ही रागावलात का ?

**प्रदीप :** रागवायचं कशावरता ? आणि कुणावरती ? ( हसतो.)

**चारू :** खोटं हसलं म्हणजे राग पुसता येत नाही.

**कर्नल :** चारू, थट्टा नको करूस. मामला गंभीर आहे.

**प्रदीप :** गंभीर आहेच.

**कर्नल :** बोला ... काय बोलायचंय् ...?

**चारू :** एक मिनिट...लीलाबाई, तुम्ही इथे अजून उभ्या का ? तुम्हाला हजार वेळा सांगितलंय्.

**लीला :** पुन्हा सांगायला लागणार नाही. ( कर्नलकडे येत ) साहेब, तुम्ही मला काही दिवसांपूर्वी विनंती केली होती. आठवतं? मी हे घर सोडून जावं म्हणून. उशीरा का होईना पण तुमची विनंती मान्य करतेय् मी. हे घर सोडून मी जाणाराय् शक्य तितक्या लवकर.

**कर्नल :** पण...

**लीला :** कुणालाही काही अक्षर न सांगता. कारण त्याचा आता काही उपयोग नाही.

**कर्नल :** आणि जाणार कुठं... ?

**लीला :** नसते प्रश्न उभे केलेत तर उगाच मागे फिरायला लागेल मला. आणि त्यानं कुणाचंच हित साधणार नाही.

**प्रदीप :** थँक्यू...लीलाबाई...

**लीला :** तुमचा विजय झाला, अभिनंदन !...पण एक गैरसमज दूर करते तुमचा. मी जाणाराय् याचा अर्थ असा नाही की मी क्षणात बदलले. सारं विसरून गेले. मी जाणाराय् याचं कारण एकच. ज्या एका कारणासाठी हे आयुष्य जगले ते कारण आता उरलंच नाही... [ जातात. ]

**चारु :** ( जवळ येत ) तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाही.

[ डोळ्यांतलं पाणी लपवीत आत जाते. ]

**कर्नल :** लीलाबाईशी तुम्ही काही बोललात ?

**प्रदीप :** मी बोललो ते फारसं महत्त्वाचं नव्हतं. पण त्या बोलल्या ते फार महत्त्वाचं होतं. तुम्ही एक गोष्ट लपवून ठेवलीत माझ्यापासून; की लीलाबाई तुमच्या त्या मित्राची बायको.

**कर्नल :** सांगण्याची कधी वेळच आली नाही.

**प्रदीप :** तुम्ही तशी वेळ येऊ दिली नाहीत. जाणीवपूर्वक.

**कर्नल :** मला तसं काहीच कारण नव्हतं.

**प्रदीप :** मग का नाही सांगितलंत? आज त्यांनी सांगितलं नसतं तर कदाचित मला कधीच कळलं नसतं. आणि मग काही प्रश्नांची उत्तरं कधीच मिळाली नसती.

**कर्नल :** मी सांगितलं नाही; कारण तुम्हाला उत्तरं मिळाली असती तर

त्यांना इथून घालवायला तुम्ही भाग पाडलं असतं. आणि मला भीती वाटली की त्या कदाचित...

**प्रदीप :** आणि तुम्ही घाबरलात... तुमच्यासारखा माणूस...

**कर्नल :** तोसुद्धा पर्सनल प्रॉब्लेम्स आले की सामान्य माणूस होतो... कर्नल राहात नाही. अजूनही मला भीती वाटते. त्या जातील आणि कदाचित...

**प्रदीप :** त्यांच्या म्हणण्यावरती चारू काडीइतका विश्वास ठेवणार नाही, असं वातावरण तुम्ही निर्माण करायला हवं होतं. पण तुम्ही आपल्या मुलीशी कधी बोललाच नाहीत. यू हॅव फेल्ड मिझरेब्ली.

**कर्नल :** तुम्हाला याच विषयावरती हेच सांगायचं होतं ?

**प्रदीप :** नाही. हे सांगितलं विषय निघाला म्हणून. जाता जाता...

**कर्नल :** जाता जाता...

**प्रदीप :** हो...

**कर्नल :** म्हणजे ?

**प्रदीप :** मला या जबाबदारीतून मोकळं करा. मी जे करू शकलो ते केलं आहे. चारू आता संपूर्ण बरी झाली आहे. आनंदात आहे. केवळ याच गोष्टी-करता मी इथं राहिलो. चॅलेंज म्हणून गेल्या कित्येक दिवसांत तिला भीतीचा किंवा कसलाच अॅटॅक आला नाही. तुम्हाला माहीत नसेल, पण तिनं गेल्या आठवड्यात लीलाबाईशी हिमतीनं मुकाबला केला. यापुढेही तिला अॅटॅक येणार नाही. कारण त्याचं मूळ इथून जाणार आहे. कायमचंच. नॅचरली माझी इथली गरज संपलेली आहे. सो प्लीज, रिलीव्ह मी.

**कर्नल :** तुम्हाला जायलाच हवं ?

**प्रदीप :** अगदी नक्की.

**कर्नल :** मी तुम्हाला जायला सांगितलं नाही.

**प्रदीप :** तुमच्या सांगण्याची मी वाट पाहू ? कशासाठी ?

**कर्नल :** तुम्ही का सोडून जाताय् ?

**प्रदीप :** इकडचा प्रश्न सुटलाय्, आणि माझे प्रश्न उभे राहताहेत.

**कर्नल :** असं काय झालं एवढं ?

**प्रदीप :** तुम्हाला सांगायला हरकत नाही कर्नलसाहेब. पण चारूत मी दिवसें-दिवस गुंतत चाललोय्. तिला जर माझ्याविषयी काही वाटलं तर तिला दोष नाही

देता येणार मला. मग तसं वागणं...आय कॅनॉट ॲफोर्ड. चारूच्या जीवनात आनंद निर्माण करता करता दुसऱ्या एका स्त्रीचं जीवन मी उजाड करून का टाकीन. अशा स्त्रीचं की जिचे माझ्यावर डोंगराएवढे उपकार आहेत, जी माझ्यावर अमाप प्रेम करते. तुम्हाला आवडो न आवडो आय हॅव टु स्टॉप धिस.

**कर्नल :** चारूच्या देखत का नाही सांगितलंत सारं ?

**प्रदीप :** ती दुखावली असती.

**कर्नल :** आणि मी ? मी दुखावला जाऊच शकणार नाही ?

**प्रदीप :** तुम्ही सहन करू शकाल.

**कर्नल :** आणि ती सहन करू शकणार नाही ?

**प्रदीप :** निश्चित करू शकेल. पण एखाद्याला सहन करता येतं म्हणून उगाच दुखवलंच पाहिजे का ?

**कर्नल :** ठीक आहे. मी तुम्हाला अडवणार नाही. तुम्ही माझ्याकरता इतकं केलंय् की त्याची किंमत कशानेही करता यायची नाही. आय् रिलीव्ह यू. आय् ॲम ग्रेटफुल फॉर वॉट यू हॅव डन.

**प्रदीप :** तुमच्या वडीलकीचा मान न राखून काही अधिक उणं बोललो असेन तर माफ करा.

**कर्नल :** ओ... ! फरगेट अबाउट इट !

**प्रदीप :** आणखी एकच गोष्ट सांगायची आहे. तुम्ही ज्या कामासाठी माझी नेमणूक केलीत ते काम झालंच नाही. सुख कुठं तरी तुम्ही विकत घेऊ पाहत होता फसवे शब्द वापरून. पण अशा गोष्टीचा जेव्हा सौदा होतो तेव्हा त्यातल्या सौंदर्याची राख होते. संधी असून मी ते केलं नाही... मला करावंसं वाटलंच नाही. ज्याला फक्त सुगंध हवा असतो त्याला पाकळ्यांना हात लावावासा वाटत नाही... दॅट्स ऑल !

**कर्नल :** ( क्षणभर स्तब्धता ) यू आर करेक्ट, माय बॉय. आय ॲम रॉंग.

**प्रदीप :** मी निघतो आता.

**कर्नल :** चारूला बोलावू ?

**प्रदीप :** नको... तुम्हीच सांगा मी गेल्यावर; जातो मी. [ जातो. ]

( कर्नल एकटेच. विचारमग्न. चारू प्रवेश करते. )

**चारू :** हे काय ? ते गेले... ?

**कर्नल :** हो... चारू...

**चारू :** काय डॅडी...

**कर्नल :** पुन्हा ते कधीही इथं येणार नाहीत...

**चारू :** असं ?

**कर्नल :** ( समजुतीच्या स्वरात ) हे बघ चारू...

**चारू :** ( डोळ्यांत पाणी ) जाऊ दे डॅडी... मला माहीत होतं हा क्षण कधी तरी येणार... मला माहीत आहे ते माझे नाहीत... ते माझे नाहीत...

( पडदा पडतो. अंधार )

## दृश्य तिसरे

[ प्रकाश येतो, तो प्रदीपच्या रूमवर. रंगभूमीजवळ कुणीही नाही. थोड्याच वेळात दार उघडून प्रदीप आणि सुमित्रा प्रवेश करतात. क्षणभर स्तब्धता. ]

**सुमित्रा :** मला वाटतं उगाच आपण फिरायला गेलो.

**प्रदीप :** का ? तुला कंटाळा आला ?

**सुमित्रा :** एकमेकांची तोंडं किती वेळ बघत बसायचं. तू एकटाच हरवल्यासारखा आणि मी बडबडतेय्. छे: !

**प्रदीप :** सॉरी !... म्हणजे तसा मी खूप बोलत होतो.

**सुमित्रा :** मग ' सॉरी ' कशासाठी ? जाऊ दे. उगाच मी तुला आग्रह केला फिरायला यायचा, मी निघते.

**प्रदीप :** थांब सुमित्रा...

**सुमित्रा :** कशासाठी ? भिंतीकडे पाहात बसायला ?

**प्रदीप :** रागावलीस सुमित्रा ? पण माझा आज मूडच नव्हता.

**सुमित्रा :** आज ? हल्ली कधीच नसतो. एकदम अनोळखी झाला आहेस. तू मला. ते नेहमीसारखं बोलणं नाही, हसणं नाही. कशात उत्साह नाही. कुठं

लक्ष नाही. एरवी कसा वागतोस मला माहीत नाही, पण निदान मी असताना तरी हे सारं असंच असतं. माझा कंटाळा आलाय् तुला ?

**प्रदीप :** ( उसनं हसत ) भलतंच काय बोलतेस सुमित्रा ! त्याचं काय आहे, सध्या ना मा माझ्या थिसीसच्या विचारात आहे.

**सुमित्रा :** खोटं ! जेव्हा तू थिसीसच्या विचारात असतोस तेव्हा तू माझ्याशी त्याच्याविषयी बोलतोस.

**प्रदीप :** सुमित्रा, माझा मूड नाही हेच खरं. ( सुमित्रा गप्प ) सुमित्रा, निदान तू तरी बोल काही तरी. बोलत रहा.

**सुमित्रा :** आणि मी मात्र बोलत नाही. गप्प राहतो. मग त्यापेक्षा ट्रान्झिस्टर लाव. ( पुन्हा शांतता. भिंतीकडे पाहात—) इकडचं स्केच काय झालं ?

**प्रदीप :** कुठचं स्केच ?

**सुमित्रा :** कुठचं ? या भिंतीवरचं. एकुलतं एक, चारूचं...

**प्रदीप :** चारूचं ?

**सुमित्रा :** तिनं काढलेलं.

**प्रदीप :** काढून ठेवलंय्.

**सुमित्रा :** का ? ( प्रदीप स्तब्ध ) माझी चूक झाली यात मला मुळीच शंका नाही. तू इतका गुंतून जाशील असं मला कधीच वाटलं नाही.

**प्रदीप :** तसं नाही, सुमित्रा.

**सुमित्रा :** निदान खोटं नको बोलूस. तुम्ही पुरुष कधी कधी फार ऑब-व्हिअस वागता. भिंतीवरचं स्केच तू काढून ठेवलंस, का तर ? तिची आठवण होऊ नये म्हणून, फिरायला येत नाहीस कारण तिथंही काही आठवणी गुंतल्या असतील...

**प्रदीप :** पण सुमित्रा...

**सुमित्रा :** प्लीज...नो आर्ग्युमेंट्स. सारं कसं सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ आहे. प्रदीप, दोष तुझा नाही. माझा आहे. सुरुवात मी करून दिलीय्. पण थांबवणं निश्चित तुझ्या हाती होतं.

**प्रदीप :** नाही सुमित्रा, थांबवणं माझ्या हातात नव्हतं.

**सुमित्रा :** का नव्हतं ? का फार पुढं गेलास ? तुला कधीच नाही का रे माझी

आठवण झाली ? कुणी तरी आपल्यात जीव गुंतवून बसलेय्. आपली वाट पाहतंय् आपल्या स्वप्नांना साथ देतंय्, कधीच— कधीच नाही आठवलं ?

**प्रदीप :** असं कसं होईल ? सुमित्रा, मी कृतघ्न नाही.

**सुमित्रा :** तुला माझी आठवण होत होती कृतज्ञतेमुळं ! अरे, ते हिशेब मी कधी केलेच नाहीत प्रदीप. ती इन्व्हेस्टमेंट नव्हती माझ्या राजा. तुझ्या स्वप्नांचं सुख मला दुरून पाहायचं होतं. तो आनंद पाहायचा होता तुझ्या इतक्या जवळ मी कधीच आले नसते. माझा आनंद मला डागाळायचा नव्हता. पण तुझ्या हट्टामुळं मी तुझ्या जवळ आले आणि ज्याला मी प्रेम समजत होते ती होती फक्त कृतज्ञता.

**प्रदीप :** ती केवळ कृतज्ञता नव्हती.

**सुमित्रा :** मग काय होतं ?

**प्रदीप :** माझ्यावर विश्वास ठेव. कृतज्ञता ही सुरुवात होती. जिव्हाळा त्याचा मध्य होता आणि प्रेम हीच अखेर होती. फक्त प्रेम...

**सुमित्रा :** आणि चारू ?

**प्रदीप :** खोटं नाही सांगत सुमित्रा, पण तिच्याविषयीसुद्धा काही तरी वाटायला लागलं होतं; आणि हे जेव्हा ध्यानात आलं तेव्हा त्यातून बाहेर निघायचा निकरानं प्रयत्न केला मी. सुमित्रा, मी नोकरी कशाकरता सोडली ? कुणाकरता ? तुझ्याकरता— सुमित्रा, केवळ तुझ्याकरता. माझे कुठचेच क्षण स्वतःचे नव्हते ! त्या क्षणांत मी होतोही आणि नव्हतोही. मला उत्साह फक्त एकाच गोष्टीचा होता. कुणाचं तरी आयुष्य मी वाचवतोय्. आनंदाचे क्षण फुलवतोय्. नाटक करता करता माझं स्वतःचंच नाटक होत होतं आणि वास्तवाचं भान हरवू नये म्हणून मी झगडत होतो स्वतःशी. तुला विसरलो नव्हतो मी सुमित्रा, कधीच.

**सुमित्रा :** तसंच चारूलाही विसरू शकणार नाहीस कधीच.

**प्रदीप :** पण मी प्रयत्न तर करतोय् ना ? झगडतोय् मी.

**सुमित्रा :** तुला प्रयत्न करावा लागतो, झगडावं लागतंय्, यात सारं काही आलं.

**प्रदीप :** तुझा गैरसमज होतोय्, सुमित्रा.

**सुमित्रा :** नाही. प्रदीप, मला सगळ्यात वाईट वाटतं ते एका गोष्टीचं. तुझ्या-

वरती अमाप विश्वास टाकून मी तुला चारूच्या जवळ जाऊ दिलं. फॉर ट्रीटमेंट. ए डॉक्टर इज नॉट एक्स्पेक्टेड टु गेट इन्व्हॉल्वड विथ ए पेशंट. मला वाटलं होतं की ही एथिक्स तू पाळशील.

प्रदीप : ए इन्व्हॉल्वमेंट नोज नो एथिक्स, सुमित्रा. मी गुंतलो हे मी कधीच नाकबूल केलं नाही. पण आता काय त्याचं? तू उगाच गैरसमज करून घेते आहेस.

सुमित्रा : नाही. उलट तुझा आग्रह आहे का मी गैरसमज करून घ्यावा. पण मी उगाच भलते समज नाही करून घेणार. आय ॲक्सेप्ट विथ ग्रेस.

प्रदीप : पण सुमित्रा.

सुमित्रा : एका प्रश्नाचं उत्तर दे. ती नसताना तू हरवल्यासारखा होतोस. मी नसताना कधी हरवल्यासारखा झाला होतास? (प्रदीप गप्प) दॅटस् ऑल!

(क्षणभर स्तब्धता)

सुमित्रा : मी निघते. जाण्यापूर्वी मी घेतलेला निर्णय तुला सांगायचाय्. 'आपण सारं इथंच थांबवू.'

प्रदीप : सुमित्रा...

सुमित्रा : तू माझ्यापासून मनानं इतका दूर गेला आहेस की, असं दोन शरीरांनी भेटणं निरर्थक झालंय्.

प्रदीप : सुमित्रा, मला समजून घे...

सुमित्रा : समजून घेऊ शकते म्हणून इतक्या शांतपणे सांगू शकतेय्. तुला मी माझ्या बंधनातून मोकळं केलंय्.

प्रदीप : नाही सुमित्रा... तुला मी मोकळी करणार नाही. तू मला हवी आहेस...अजूनही !

सुमित्रा : 'अजूनही' म्हणजे...? (तो गप्प) जितका तू जास्त बोलतोयस तितका तू जास्त उघडा पडतो आहेस...नकळत.

प्रदीप : सुमित्रा...

सुमित्रा : शिवाय तुला मी हवी असले तरी आता तू मला नको आहेस.

प्रदीप : तू मला सोडून जाणार? लग्न करायची शपथ विसरलीस?

सुमित्रा : तू इतक्या गोष्टी विसरलास की मी एखादी गोष्ट विसरले तर काय बिघडलं? शिवाय निष्प्रेम संसार करायचा तर तो कुणाबरोबरही करता येईल त्याकरता तूच कशाला हवास?

**प्रदीप :** माझं खरंच प्रेम आहे तुझ्यावर... खूप खूप प्रेम आहे. ( सुमित्रा केवळ एक ' लुक ' देते )... तुझा विश्वास नाही माझ्यावर ?... ( ती गप्प ) बोल ना... खरंच तुला असं वाटतं, मी तुला फसवलं ? मी काय केलं म्हणजे तुला माझा विश्वास वाटेल ?... माझ्या एकाही प्रश्नाचं उत्तर देणार नाहीस ?

**सुमित्रा :** उत्तरं मी काय देणार ? हा प्रत्येक प्रश्न तू स्वतःला विचार सगळी उत्तर तुला मिळतील... [ जायला निघते. ]

**प्रदीप :** थांब...सुमित्रा...( सुमित्रा थांबते. ) सगळे निर्णय या क्षणालाच घ्यायला हवेत का ? हे बघ सुमित्रा...मला संधी दे. असा तडकाफडकी निर्णय घेऊ नकोस. मी कबूल करतो की माझी इन्व्हॉल्वमेंट झालीय्. पण मला त्यातून बाहेर पडायची संधी दे. थोडीशी सवड दे. मी प्रामाणिक प्रयत्न करीन. एकाच वेळेला एकाहून अनेक माणसं आवडू शकतात. सांग, नाही शकत ? बोल ना ? मघाशी तू बोलत होतीस आणि मला खूप बरं वाटत होतं. पण तुझं हे गप्प बसणं जीवघेणं आहे. त्यानं मी केविलवाणा होतो उगाचच. सुमित्रा, मला फक्त एकदाच संधी दे.

( ती गप्प... निश्चयानं उठते. जायला निघते. दारावर टकटक. ती थांबते. दार उघडते. दारात लोखंडे. )

**प्रदीप :** तुम्ही...? इथं कसे ?

**लोखंडे :** कामाकरता आलोय्.

**प्रदीप :** असे अचानक...

**लोखंडे :** यावं लागलं. चारूकडे किती दिवसांत गेला नाहीत ?

**प्रदीप :** तो तुमचा प्रश्न नाही !

**लोखंडे :** सुमित्रा, इतकं चिडून उत्तर देण्यासारखा हा प्रश्न होता का हो ? तुम्हाला काय वाटतं ?

**प्रदीप :** मी माझ्या घरी चिडतोय्.

**लोखंडे :** पण ते माझ्यावर ! चिडायचं असलं तर स्वतःवर चिडायचं.

**प्रदीप :** तुमचं काय काम आहे माझ्याकडे ?

**लोखंडे :** हे चिडायच्या आधी विचारलं असतं तर ? म्हणजे सुरुवातीलाच वातावरण ताणलं गेलं नसतं. असो. मी तुमच्याकडे कामाकरता आलोय्. आयुष्यभर तुम्ही दुसऱ्यांच्या चुका काढल्या असतील. दुसऱ्यांची आयुष्यं

सुधारण्याकरता कुणाचं कुठं काय चुकलं ते सांगत आलात; पण आज मी आयुष्यभर चुकत आलेला माणूस, तुम्हाला सांगायला आलोय्–' तुमचं चुकलं!'

**प्रदीप :** हे पहा...

**लोखंडे :** चिडायचं नाही. चिडलात तर माझं खरं ठरेल. जो चुकतो तोच चिडतो.

**प्रदीप :** तुम्ही मला तत्त्वज्ञान सांगायला आला आहात?

**लोखंडे :** आपल्याला ते जमत नाही. ते तुमचं काम!

**प्रदीप :** तुमचं माझ्याकडे काय काम आहे?

**लोखंडे :** इतक्या दिवसांत चारूकडे फिरकला नाहीत! माणसांनी माणसं जरूर तोडावीत, पण झाडांच्या फांद्यांसारखी नाहीत, तर माणसासारखी. निदान...

**प्रदीप :** हे पहा, तुम्हाला उत्तर द्यायला मी बांधलेलो नाही, पण तरीही सांगतो. मी निर्दय नाही. तरीही मला नाइलाजानं तिला माझ्या आयुष्यातून दूर करायला लागलं. शेवटी मलाही माझं आयुष्य आहे.

**लोखंडे :** तरीही तिच्या सध्याच्या परिस्थितीत तुम्ही राग विसरून तिला भेटायला हवं होतं. तुम्हाला साधी माणुसकी नाही?

**प्रदीप :** तिनं इतकं मनाला लावून घेतल्यावर माझा नाइलाज आहे.

**लोखंडे :** पण डॅडींचा आधार तुटल्यावर तिनं कुणाच्या तोंडाकडे पहायचं?

**प्रदीप :** काय?... तुम्ही काय म्हणलात...डॅडी...

**लोखंडे :** तुम्हाला माहीत नाही? डॅडी गेले! हार्ट ॲटॅकनं ... आज चार दिवस झाले!

**सुमित्रा :** ( स्वतःशीच ) चारूचे डॅडी गेले ... !

**प्रदीप :** डॅडी गेले ... ओ नो...मला खरंच माहीत नव्हतं. कुणी कळवलं नाही; नाही तर मी..

**लोखंडे :** सॉरी! मला माहीत नव्हतं तुम्हाला माहीत नव्हतं ते. माणसाचं असंच होतं. माहीत नसताना काही तरी बोलत त आणि मग चुकीची ठरतात. जाऊ दे. मला माफ करा. हे पाहा, आता मी तुम्हाला कळवलंय्. आता तरी तुम्ही चारूला भेटा. तिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळलाय्!

**प्रदीप :** मी ...? मी भेटून काय करणार?

सुमित्रा : तू तिला भेटायला हवंस ... !

प्रदीप : सॉरी !... मी तिला भेटणार नाही.

लोखंडे : असं कसं म्हणता ?

सुमित्रा : प्रदीप, तू चुकतो आहेस.

प्रदीप : शक्य आहे. पण मला भेटायचं नाही.

सुमित्रा : पण का ... ?

प्रदीप : निदान तू तरी हा प्रश्न विचारू नयेस.

सुमित्रा : पण या क्षणी चारूला तुझी गरज आहे.

प्रदीप : सुमित्रा, मी तुला हवाय् ना ?

सुमित्रा : पण चारूला तुझी जास्त गरज आहे.

प्रदीप : सुमित्रा ...

सुमित्रा : होय प्रदीप; तिच्याकडे तू जायला हवंस. तिला आधार द्यायला हवास. कदाचित कायमचा. होय; शुद्धीत बोलतेय्. तुझ्याशी माझं लग्न होणार नाही हे मी कधीच ओळखलं होतं. मघाशी तसं विचारलं ते केवळ तुझं मन बघण्याकरता. शब्दांनी बोलत नाहीस तरी हो म्हणताना तुझी होणारी तडफड मला जाणवत होती. तरीही मन मारून मला हो म्हणालास तुला माझी ओढ असेल, मी नाही म्हणत नाही. पण तिची ओढ तुला जास्त आहे हे मी जाणते. सहानुभूतीतून निर्माण होणारं प्रेम हे कृतज्ञतेतून जन्माला येणाऱ्या भावनेपेक्षा फार मोठं असं असतं. आणि असं असू शकतं, त्यात अपराध्यासारखं वाटायचं काही कारण नाही. आणि आता तर ती एकटी आहे. या अफाट जगात अगदी एकटी. तिला जर तू आधार देऊ शकला नाहीस तर ती उन्मळून पडेल. मला तुझ्या आधाराची मुळीच गरज नाही; — जशी आज तिला आहे. मी माझ्या पायावर स्वतंत्र उभी आहे...खंबीरपणे. आणि मी कोलमडून पडणार नाही. मघाशी मी म्हटलं ते वरवरचं नव्हतं. निष्प्रेम संसार करायचा तर या जगात मी कुणाशीही करू शकेन. जुळवून घेईन. प्रदीप, तू माझ्याकरता नाहीस. तू मनानं केव्हाच तिचा झाला आहेस. आणि कायम तिचाच रहा. तुझ्या आड मी मुळीच येणार नाही.

प्रदीप : सुमित्रा, मला लाजवू नकोस.

सुमित्रा : नाही रे राजा, मनापासून सांगतेय् मी. वाईट एकाच गोष्टीचं वाटतं,

तुझी स्वप्नं जेव्हा पुरी होतील तेव्हा त्यात मी नसेन...त्या स्वप्नात मी नसेन... जाऊ दे...चलतोस ना?

**प्रदीप :** कुठे?

**सुमित्रा :** चारूकडे! या क्षणीच!

(तो यंत्रवत् उठतो. दोघे दरवाजाकडे जात असतानाच पडदा पडतो. अंधार.)

## दृश्य चौथे

[प्रकाश येतो तो चारूच्या घरावर. दिवाणखान्यात कुणीही नाही. दारावरची बेल वाजते. चारू दार उघडते. दारात सुमित्रा, प्रदीप. चारू अस्पष्ट 'या' म्हणते आणि दारापासून दूर सरकते. क्षणभर स्तब्धता.]

**प्रदीप :** आताच कळलं... आणि तसेच आलो. आधी विश्वासच बसेना... पण...

**सुमित्रा :** आम्हांला कळवलं का नाहीस?

**चारू :** तसं सगळं अचानक झालं.

**प्रदीप :** पण निदान नंतर...

**चारू :** नाही कळवलं...

**प्रदीप :** पण का...?

**चारू :** 'ज्यानं प्रश्न निर्माण होतात ती माणसं टाळायची असतात' असं तुम्हीच शिकवलंय् मला.

**प्रदीप :** नाही चारू... माझ्या वागण्याचा अर्थ तुला कधी समजलाच नाही. चारू, मघाचाच प्रश्न पुन्हा विचारतोय, मला का नाही कळवलंस? मी आलो नसतो?

**चारू :** तुम्ही निश्चित आला असता हे मला माहीत होतं.

**प्रदीप :** मग?

**चारू :** म्हणूनच नाही कळवलं.

सुमित्रा : इतका राग आहे तुझा यांच्यावर ?

चारू : मी यांच्यावर रागावूच शकत नाही.

प्रदीप : उलट चारू, अशा प्रसंगी जवळच्या माणसांचा आधार लागतो.

चारू : मला तो आधार नको होता. प्रदीप, तुम्ही मला निर्भय केलंत, आत्मविश्वास दिलात तो कशासाठी ?

सुमित्रा : तरीही असे प्रसंग एकट्यानं नाही सोसता येत.

चारू : मी एकटी कुठे होते ?

प्रदीप : म्हणजे ?...

चारू : माझा आत्मविश्वास माझ्या संगतीला होता.

सुमित्रा : तुला कुणाचीच गरज नाही ?

चारू : मला गरज सगळ्यांची आहे. पण मला गरज नाही आधाराची. ज्याला आधार लागतो तो आत्मविश्वास नव्हे, ती निर्भयता नाही.

सुमित्रा : आता पुढे काय करायचं ठरवलं आहेस...?

चारू : म्हणजे...?

सुमित्रा : हे बघ चारू, एकटीनं आयुष्य काढायचं म्हणजे...

प्रदीप : सुमित्रा...

चारू : खरं सांगू ? 'एकटेपण' ही शेवटी मनाची स्थिती आहे. मला नाही, वाटत मी एकटी आहे.

सुमित्रा : तू खरंच एकटी नाहीस... प्रदीप आहे की...

चारू : म्हणजे...?

प्रदीप : सुमित्रा, मी नकोसा झालोय् ?

सुमित्रा : मला नकोसा होण्यापेक्षा तू कुणाला तरी हवा आहेस.

चारू : कुणी सांगितलं ?

सुमित्रा : चारू, प्रदीपवरचा माझा हक्क मी सोडून दिलाय्.

चारू : कुणासाठी ?

सुमित्रा : तुझ्यासाठी.

चारू : आणि मला गरज नसली तर...

सुमित्रा : पण तूच म्हणाली होतीस की त्याच्या आधाराशिवाय तू जगूच शकणार नाहीस.

**चारू :** हो, मलाही असंच वाटलं होतं. त्यांच्या आधाराची इतकी सवय झाली होती की त्यांच्याशिवाय मी कोलमडून पडेन असं मला वाटलं होतं. पण मग लक्षात आलं की हे खरं असलं तर तो त्यांचा पराभव आहे. मी संपूर्ण निर्भय झालेली नाही. माझ्याकडे अजूनही आत्मविश्वास नाही असा त्याचा अर्थ होईल आणि मी शिकवलं स्वतःला की— नाही... हे बरोबर नाही. हो, माझ्या मनात काही तरी वेगळी भावना उमलत होती. आयुष्यात कुठेच माया न मिळालेल्या माणसाला कुणाचा चांगुलपणा म्हणजे प्रेम वाटायला लागतं, पण त्याही भावनेला मी मनाचे दरवाजे कायमचे बंद करून टाकले. तुमच्या भावना उधळून तुमचं माणूस तुमच्यापासून हिरावून घेण्याइतकी कृतघ्न मी नाही. उमलेलं फूल चुरगळून टाकण्यापेक्षा एखादी उमलणारी कळीच खुडून टाकणं चांगलं नाही ?

**सुमित्रा :** तुझं प्रेम नाही त्यांच्यावर ?

**चारू :** तुम्ही ज्या अर्थानं म्हणताय् त्या अर्थानं नाही. माझ्या मनात त्यांच्याविषयी आहे फक्त अतिशय आदर आणि कृतज्ञता, आणि अपेक्षा आहे फक्त स्नेहाची. आणि तरीही डॅडी गेल्यावर मी तुम्हाला कळवलं नाही... कारण सांगू ! तुम्ही ज्या तडकाफडकी आमच्याकडे येणं बंद केलंत तेव्हाच मला कळलं, तुम्हाला माझ्याविषयी काय वाटायला लागलंय्. आणि ते मला पुढं जाऊ द्यायचं नव्हतं. कारण ते हिताचं नव्हतं. कुणाच्याच. तुम्हाला मी दुखावलं असेल तर माफ करा... पण...

**प्रदीप :** नाही चारू, तू फार शहाण्यासारखी वागलीस. तुझं म्हणणं खरं आहे. तुझ्या आकर्षणात मी गुंतत चाललो होतो. नकळत गुरफटत होतो. आणि त्याच वेळेला सुमित्राकडे खेचला जात होतो.

**चारू :** ( सुमित्राला ) तुमच्या नाही कधी लक्षात आलं ?

**सुमित्रा :** खूप उशीरा !

**चारू :** मग तुम्ही थांबवलंत का नाही त्यांना !

**सुमित्रा :** अशा थांबवून काही गोष्टी नाही थांबवता येत. हे बघ चारू, भावनेच्या भरात निर्णय घ्यायची मला सवय नाही. मी अतिशय विचारपूर्वक काही गोष्टी ठरवल्या आहेत. त्यातली पहिली... प्रदीपला मी माझ्या बंधनातून मोकळं केलंय्...

**चारू :** तुम्हाला एक विचारू ? डोळ्यांत अश्रू भावनेच्या भरात येतात का विचारानं येतात ?

**सुमित्रा :** चारू, शेवटी मीही एक स्त्री आहे.

**चारू :** म्हणूनच स्वतःला फसवणं आता पुरे झालं.

**सुमित्रा :** मी स्वतःला फसवत नाही... माझं त्यांच्यावर खूप प्रेम आहे. पण तरीही मी दूर होतेय्. का ? माहीत आहे... त्यांचं प्रेम मात्र...

**चारू :** तुमच्यावरच आहे. तुम्हाला मी सांगायला नको. पण स्पर्शाची भाषा स्त्रीला लगेच समजते. तुम्हाला खरं सांगते, संधी असूनही कधी त्या भावनेनं त्यांनी मला स्पर्श केला नाही... त्यांचा स्पर्श माझ्याशी कधी बोललाच नाही. आणि पुरुषाला हे शक्य असतं, जर एखाद्या ठिकाणी निष्ठा असली तर, कुणाचे तरी पाश खेचत असले तरच... ते तुमचे आहेत,– फक्त तुमचे.

( काही क्षण शांतता. सुमित्रा तशीच उभी. )

**प्रदीप :** [ वळतो; वेगानं दाराकडे जातो. ]

**सुमित्रा :** थांबा... प्रदीप...

[ प्रदीप थांबतो. ती जवळ येते. त्याचा हात घट्ट पकडते. चारू त्यांना हात करते. ती दोघं जातात. चारू एकटी. ]

( पडदा पडतो. )

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र. 98328 नों. दि. 30/5/80
वि. नाटक क्र. ...